□ महाराष्ट्रातील संस्कारक्षम बालगोपालांना

## आमची भूमिका

हल्लीच्या प्रवाहपतित आणि संस्कारशून्य जगात आपली मुले सुसंस्कृत कशी होणार ? याची चिंता सर्वांनाच वाटत आहे. अशा वातावरणात संस्कारक्षम कुमार वयातील विद्यार्थ्यांचा गोंधळ उडून गेला आहे. काय बरोबर आहे, आयुष्य काय केल्याने यशस्वी होईल हे त्यांना कळेनासे झाले आहे. अशा वेळी कुमारांची अनुकरण प्रियता, भव्यत्वाचा व नाविन्याचा हव्यास आणि आदर्शाची ओढ लक्षात घेऊन त्यांना संस्काराचे मधुघोट देण्यासाठी आम्ही 'मनो-रंजनातून संस्कार' भाग १, २, ३, लेखक डॉ. म. गो. देशपांडे, या पुस्तिका प्रकाशित करीत आहोत.

कुमारांच्या जीवनाचे तारू सुरळीत पैलतीराला पोहचविणारे चिकित्सक विचार यात काठोकाठ भरलेले आहेत. आणि ते अत्यंत सुबोधपणे आणि गोष्टीरूपाने मांडले आहेत. या पुस्तकाच्या वाचनाने कुमारांच्या जीवनाला दिशा तर मिळेलच पण आदरासारखी अत्यंत दुर्लभ होत चाललेली भावना त्यांच्या मनात प्रज्वलित होईल.

संस्कारांचे, विचारांचे व्यापकपण गोष्टीरूपातून सांगणे हा या पुस्तिकांचा हेतू असला, तरी आपण काही शिकण्यासाठी या कथा वाचीत आहोत हे न कळताच विद्यार्थी यातील विचारांचे ग्रहण करतील आणि चिंतनशील व अंतर्मुख बनतील. समज व समतोल या दुर्मिळ होत चाललेल्या भावना त्यांच्या मनात न कळत शिरतील. जगातील मोठमोठ्या विचारवंतांचे अनेक विषयावरचे तत्त्वज्ञान कुमारांना समजेल, पटेल, आवडेल आणि त्यांच्या मनावर ठसा उमटवील अशा भाषेत यात मांडले आहे.

कुमार वयात मुलांमध्ये अनेक इष्ट व अनिष्ट प्रवृत्तींचे प्रति-

बिबं दिसून येते. कसले ना कसले वेड त्यांच्या डोक्यात असते. त्यांचे मन निष्फळ भरकटत जाण्याची शक्यता असते. अशा वेळी त्यांची धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक कुचंबणा थांबविण्यासाठी त्यांना सुजनवाक्य ऐकविण्याची, सुसंगती घडवून आणण्याची कामगिरी अशा पुस्तिकांनी निश्चित घडून येईल. मानवतावाद, सत्यनिष्ठा, आचार-शुद्धता, सामाजिक न्याय, सहिष्णुता, शांती, सहकार आणि प्रेम अशा मूल्यांविषयीचे विचार विद्यार्थ्यांपुढे ठेवण्याची आजची मोठी गरज या पुस्तिकांनी अंशतः भागेल.

या पुस्किांच्या परिशीलनाने विद्यार्थी बुद्धिनिष्ठ व विशाल मनाचा होईल. जीवन मरणासारख्या तात्त्विक विषयांवरही विचार करुन त्याच्या जीवनातील औदासिन्य, भ्रांती व भ्रष्टता नाहिशी होईल आणि त्याच्या चित्तात शुद्ध, सात्त्विक मानवतावाद ठसेल. या पुस्तिकांत मांडलेले सुबोध विचार चिरंतन स्वरुपाचे आहेत. त्यामुळे कुमारांच्या विचारांना तात्त्विक अधिष्ठान लाभेल याबद्दल आम्हांला संदेह नाही.

डॉ. म. गो. देशपांड्यांना आम्ही आमची कल्पना सांगितली ती त्यांनी ' मनोरंजनातून संस्कार ' या पुस्तिकांद्वारे सफल केली. त्यांचा ऋणभार असाच वाढत जावा. डॉ. म. गो. देशपांड्यांच्या पत्नी डॉ. सौ. शारदा देशपांडे यांनीही ' सन्मित्र प्रकाशन ' वर अपत्यवत् प्रेम केले. त्यांचे मातृत्त्व असेच आम्हांस सदैव लाभो.

चित्रकार श्रीकांत हर्डीकर, श्री प्रोसेस, न्यू आनंद प्रिंटींग प्रेस, ललित प्रिंटींग प्रेस या सर्वांनी आपली कामगिरी चोख बजावली म्हणून त्यांच्याही ऋणात आम्ही राहू इच्छितो.

**सन्मित्र प्रकाशन**
**कोल्हापूर.**

## अनुक्रमणिका


- जीवन शिक्षण
- सामाजिक समता
- संत तुलसीदास
- सर्वनाशाच्या उंबरठ्यावर
- खिचडी पकाता हूँ !
- कोण किती सुखी ?
- दुर्बलांना मदत
- श्रमाची प्रतिष्ठा
- वैराग्य कसे उपजते ?
- सुखदेव, भगतसिंग व राजगुरु
- बहुमताचा कारभार जपून करावा
- पराकोटीचे आशावादी जीवन
- रामशास्त्री व थोरले बाजीराव
- सत्यवचनी भीष्माचार्य
- जुगार
- हसणारे तीन संत
- प्रभावी योजकता
- आसक्तीचा नाश
- पराकोटीची चिकाटी
- सामान्य जनांबद्दल अपार करूणा
- निरिच्छपणा
- जीवन ही यात्रा आहे
- टांगेवाला भांडवलदार कसा ?
- कर्मवीर भाऊराव पाटील
- जे. कृष्णमूर्ती
- कोणाचे पाय चांगले

**छापत आहोत**

राष्ट्रपती, पंतप्रधान, अनेक राष्ट्रीय नेते व क्रांतिकारकांचा सहवास लाभलेल्या लेखकाच्या लेखणीतून अवतरलेली,

## अग्नीफुलें

**भाग १. २, ३.**

( पन्नास क्रांतिकारकांच्या जीवनातील रोमहर्षक, साहसी प्रसंगांचे आणि त्यांच्या जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन )

**लेखक– बा. बा. महाराज**

आपल्या मुलांमध्ये सुसंस्कार, साहस आणि राष्ट्रीयत्वाची भावना रुजविण्यासाठी ही पुस्तके आपल्या संग्रही हवीतच.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १५६३ दिनांक ३।१।८४
विषय ........ क्र. ........

## जीवनशिक्षण

हल्लीचे शिक्षण म्हणजे बहूविध माहितीचे संकलन किंवा स्मरण होय. हे शिक्षण पुस्तकी ज्ञान शिकविते. या शिक्षणाने पदव्या मिळविता येतात. पण उत्कृष्ट अभ्यासू हुशार विद्यार्थी जीवनात चांगल्या प्रकारे जगू शकेल अशी खात्री नाही. ज्ञानाच्या शाखा अगणित आहेत. काळ फार थोडा आहे. कोटयावधी जन्म मिळाले तरी शिक्षण म्हणजे माहितीचे संकलन आणि स्मरण संपणार नाही. मग हल्लीचे शिक्षण किती घ्यावे ? कोणी घ्यावे ? हे ज्याने त्याने परिस्थितीनुरूप आपल्या आवडीप्रमाणे ठरवावे. या पुस्तकी ज्ञानाचा उपयोग पदवी व भाकरी मिळविण्यास जरुर होईल. पण यशस्वीपणे जगावयचे असेल, तर शिक्षण जीवनाभिमुख पाहिजे. जीवन कसे जगावे हे कळेल ते शिक्षण होय. तत्त्वज्ञान जीवनशिक्षण देते. यशस्वी जीवनाची कला शिकविते.

विनोबा म्हणतात, 'जीवनशिक्षणात विद्यार्थी शिक्षकपरायण हवा. शिक्षक विद्यार्थीपरायण हवा. दोघेही ज्ञानपरायण हवेत आणि ते ज्ञान सेवापरायण हवे. ही सेवा म्हणजे समाजाची सेवा.'

शिक्षण भस्मासूर आहे. तंत्रज्ञानाने हल्ली एवढी प्रगती केली आहे, की अणुविज्ञानाने सारे जग काही क्षणात बेचिराख होईल अशी भयानक संहारक अस्त्रे आपण निर्माण केली आहेत. केव्हा कोणाचे डोके फिरेल व अणुशस्त्राचा वापर होईल आणि सर्वनाश ओढवेल

ते सांगता येत नाही. इंग्लंड, अमेरिकेसारख्या देशात दहा टक्के लोक संपूर्ण विनाशाच्या भीतीने मानसिक दृष्टीने आजारी आहेत. शास्त्रतंत्र जितके प्रगत होते आहे तितकी मानसिक भीती वाढते आहे. आपल्या जीवनात समता, बंधुता, करुणा व प्रेम या गोष्टी लोपत चालल्या आहेत. आपण साक्षर आंधळे बनत चाललो आहोत. जीवनात मूल्यांचा विचार झाला पाहिजे. आपल्या शेजाऱ्यावर आपल्या इतकेच प्रेम करा असा येशूने संदेश दिला.आपल्याप्रमाणेच इतर लोक म्हणून त्यांच्याबद्दल आदर वाटला पाहिजे. अशा तऱ्हेचे शिक्षण म्हणजे जीवनशिक्षण, ते दिले गेले पाहिजे. आज हजारो लोक आत्महत्या करतात याचे कारण ते सुशिक्षित असले,तरी त्यांना जीवनशिक्षण मिळालेले नाही. जीवनाला म्हणजे संकटांना आणि दु:खाला सर्व शक्तिनिशी सामोरे जाणे म्हणजेच जीवनशिक्षण होय.

शिक्षणाचा बाजार झाला आहे. कोणाची कोणाला आस्था नाही. बेफिकीर वृत्ती वाढत आहे. दूरदर्शीपणा फारसा कोणी दाखवीत नाही. जीवनशिक्षणाकडे पाठ फिरवून आम्ही शिक्षणाच्या विकृत स्वरूपाचा अंगिकार करीत आहोत. हे जीवघेणे शिक्षण आम्हाला माणुसकीपासून वंचित करीत आहे. बुडत्या माणसाला बुडत असतांना कसे वाचवावे या पुस्तकातल्या सूचना वाचून दाखवून चालणार नाही. कोणीतरी उडी घेऊन बुडत्याला आधार दिला पाहिजे. जीवनशिक्षणाने प्रेम हा आपल्या आयुष्यातील स्थायीभाव व्हायला पाहिजे. अशा शिक्षणाने माणसाच्या काळजाला हात घातला पाहिजे. प्रेम या विषयावर सुंदर प्रवचन करणे निराळे आणि प्रत्यक्ष जीवनात प्रेमळ असणे निराळे ! कधी शिकविले गेले व कधी घेतले गेले हे न कळता जे माणसाला घडविते तेच जीवनशिक्षण !

□

आपल्यासारख्याच आईबापापोटी जन्म घेतलेल्या लोकांना आम्ही शेकडो वर्षे अस्पृश्य ठरविले. हीन लेखले-उपेक्षित ठेवले त्यांना ज्ञानाची, अभ्यासाची संधी नाकारली. जन्माने माणूस सर्वत्र सारखाच, पण एकाला उच्चवर्णीयाच्या पोटी आला म्हणून उच्चवर्णीय म्हणावयाचे व एकादे मूल नीच वर्णीयाच्या पोटी आले म्हणजे त्याला अस्पृश्य समजावयचे गीतेत सुद्धा चातुर्वर्ण्य मी गुणकर्मानुसार निर्माण केले असे भगवान सांगतात. मग ही जन्मावरून उच्चनीचता, अस्पृश्यता कोणी निर्माण केली? तुमच्या आमच्या पूर्वजांनीच ना? ती पाळणारे आपण त्या पूर्वजांइतकेच दोषी आहोत.

पैठणला रणरणत्या वाळूत एक महाराचे पोर दुपारची तापलेली वाळू पोळते म्हणून धाय मोकलून रडत होते. सारे त्याच्याकडे पहात व मूल अस्पृश्याचे असल्याने तेथून निघून जात होते. एकनाथ महाराज गंगेत स्नान करून येत असता त्यांनी त्या मुलाला पाहिले व धावत जाऊन छातीशी उचलून घेतले. महारवाड्यात त्याच्या आईकडे नेऊन दिले. इतर लोक सांगत होते, 'अहो नाथ ते महाराचे पोर कशाला उचलून घेतलेत?' एकनाथ महाराजांची मानवी व दैवी एकता कोण जाणू शकले? अद्यापही हरिजनांवर अत्याचार होतच आहेत. तेच तथाकथित अस्पृश्य लोक बंडाचे निशाण घेऊन प्रतिकार करतील आणि केलाच पाहिजे. माणूस माणसाला शिवल्यावर सोवळ्याचे ओवळे होतेच कसे? तुकाराम महाराज

परखडपणे विचारतात 'ऐसे कैसे हो सोवळे, शिवता होतसे ओवळे? मन नाही निर्मळ। काय करील साबण'.

सामाजिक एकता तुमच्या आमच्या नसात भिनली पाहिजे. देशोदेशी असे दलितांचे विभाग माणसानेच केले आहेत. अशी विषमता मानणे हे कमालीचे क्रौर्य आहे. जो धर्म किंवा तत्वज्ञान अस्पृश्य या कल्पनेचा स्वीकार करते ते तत्वज्ञान व तो धर्म खोटा, विकृत स्पृश्य, अस्पृश्य, काळागोरा, प्रादेशिक भेद हे मानवी मनाचे शोचनीय दोष आहेत. जन्मजात उच्चनीचता, खोटी, तिरस्करणीय व निंदनीय आहेत. इतिहासातल्या कोठल्या तरी काळ्याकुट्ट खंडात या विषाची पेरणी झाली. त्याने अजून माणसे गुदमरुन जातात.

खेदाची गोष्ट म्हणजे मानवाला मुक्तिमार्ग सांगणारे धर्म एकमेकास नुसते उच्चनीच समजत नाहीत, तर आपल्या धर्माच्या वर्चस्वासाठी दुसऱ्यांची भीषण कत्तल करतात. मानवाचे यापेक्षा दुर्दैव कोणते? शांतिदूतांचीही कत्तल होते मग सामान्य माणसाची काय कथा?

आता नव्या समाजरचनेत आपल्याला वर्गविहीन व जातिरहित समाज निर्माण करावयाचा आहे. आपण आपल्यापुरती निर्मळण पहावी. उपदेशकाची भूमिकादेखील घेणे नको. मानवी मन जितके सुसंस्कृत होते त्यापेक्षा हजारो पटींनी अधिक ते क्रूरदेखील होऊ शकते. त्या मनाची मशागत सामाजिक समतेनेच झाली पाहिजे आणि आपल्यापासूनच ही सुरुवात झाली पाहिजे. मोठेमोठे संत, धर्मसंस्थापक, मानवतावादी महापुरुष सर्वांनी हे वारंवार सांगितले आहे, पण आपल्याला त्याचा सुवास अजून यायचा आहे की काय कोण जाणे!

□

## संत तुलसीदास

उत्तरेकडे तुलसीदास हे महान संत होऊन गेले. त्यांनी तुलसीरामायण हे महाकाव्य रचले आहे. त्यांच्या तरुणपणची गोष्ट आहे. नुकतेच त्यांचे लग्न झाले होते. दिवस सुखात चालले होते. एकदा तुलसीदासांची पत्नी माहेरी गेली. बायको घरात नसल्याने तुलसीदास अस्वस्थ झाले. त्यांचे त्यांच्या बायकोवर फार प्रेम होते. पुरते चार दिवस झाले नाहीत तर तुलसीदास पत्नीविरहाने कावरे-बावरे झाले. पत्नीचा विरह असह्य झाल्याने त्यांनी सासुरवाडीला जाऊन बायकोला भेटायचे ठरवले. वेळ रात्रीची होती, तरी ते सासुरवाडीला गेले. सासरच्या लोकांना उठवण्यापेक्षा सरळ बायकोच्या खोलीत जावे असा विचार करुन त्यांनी बायकोला हळू आवाजात हाका मारल्या. इतक्यात बायकोच्या खोलीच्या खिडकी-पासून खाली एक दोर लोंबत असलेला त्यांना दिसला. तुलसी-दासांना वाटले, आपल्या हाका ऐकून बायकोनेच वर येण्यासाठी दोर सोडला आहे. तुलसीदास त्या दोराला धरून खोलीच्या खिडकीपाशी गेले व त्यांनी बायकोला हाका मारल्या. ती जागी झाली, तिने दार उघडून त्यांना आत घेतले, पण ती चकित झाली.

तिने विचारले, ' केव्हा व कसे आलात माडीवर ?'

तुलसीदास म्हणाले, 'तुला हाका ऐकू आल्या नाहीत काय?'

ती म्हणाली ' नाही '

‘ मग तुझ्या खोलीच्या खिडकीपासून खालपर्यंत दोर कोणी सोडला ?’

‘ मी गाढ झोपले होते. बघू या कसला दोर होता तो ?’ त्या दोघांनी दिवा घेऊन पाहिले, तर एक प्रचंड नाग खिडकीवरून खाली लोंबकळत होता आणि त्याला धरून तुलसीदास वर चढले होते. तुलसीदास व त्यांच्या पत्नीला धक्काच बसला.

तुलसीदासांच्या पत्नीने रागावून म्हटले, ‘ अहो, मला येथे येऊन चार दिवसही झाले नाहीत, तर तुम्ही पाठोपाठ आलात. इतका का माझा विरह तुम्हाला असह्य झाला ? इतकी का माझ्या देहाची तुम्हाला आसक्ती वाटली ? केवढ्या मोठ्या नागाला दोर समजून मला भेटण्याचे धाडस केलेत ? इतकी ओढ, इतकी निष्ठा जर तुम्ही देवाच्या भेटीसाठी वापरलीत, तर तुम्ही मोठे संत व्हाल. या देहाचा लोभ सोडा, देवाचा लोभ धरा.’ बायकोने केलेल्या निर्भत्सनेमुळे तुलसीदासाला मोठे वैराग्य निर्माण झाले व त्यांनी आपला पुढील काळ रामभक्तीत व रामायण रचण्यात घालवला. तुलसीदास मोठे संत झाले. त्यांचे रामायण उत्तरेत घरोघरी वाचले जाते. संतांच्या जीवनात असेच काहीतरी अलौकिक घडते व त्यामुळे त्यांच्या नेहमीच्या जीवनाला कलाटणी मिळून परिवर्तन होते. हा परिवर्तनाचा क्षण केव्हा येतो याबद्दल निश्चित काहीच सांगता येत नाही. मात्र आपण विवेकाने जागरुक राहून असे परिवर्तन घडण्याची वाट पाहिली पाहिजे.

□

## सर्वनाशाच्या उंबरठ्यावर

१९४५ सालचा ऑगस्ट महिना. अमेरिकेच्या टिनियन बेटावरील हवाईदलाची छावणी ५ ऑगस्टला सर्व वैमानिकांना बोलावून घेऊन तेथल्या अतिगुप्त कार्यालयात प्रत्येकाला आपली कामगिरी सांगण्यात आली. सतत सात तास भ्रमण करून अमेरिकेची बॉबफेको विमाने जपानच्या किनाऱ्यावर आली. मेजर इथर्ले आपल्या विमानातून मागच्या बॉंब असलेल्या विमानाला माहिती देत होता. हवामान उत्तम. जवळपास शत्रूची विमाने नाहीत. काहीच प्रतिकूल नाही. एवढी माहिती देताच हिरोशिमा या जपानमधील शहरावर ही विमाने घोंगावली. ८ वाजून ५ मिनिटांनी इथर्लेच्या मागच्या 'एनोला गे' या विमानातून मेजर फेरेबी याने बॉंब सोडणारी कळ दाबली. बॉंब सुटला व तो हिरोशिमा शहराच्या मध्यभागी पडला. हवाई हल्ल्याचा इशारा देऊनही हिरोशिमातील सर्व लोक आपापल्या कामात दंग होते. बॉंब फुटला. प्रचंड दैदिप्यमान पांढऱ्या प्रकाशाचा अति प्रखर झोत दिसला. त्यानंतर अतिदाहक, जाळणारी, भाजणारी, अती तीव्र उष्णता व प्रचंड हवेचा दणका उठला. मोठमोठ्या इमारती पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्या. प्रचंड आगी लागल्या. मेजर इथर्लेचे काम म्हणजे बॉंब टाकल्यावर होणाऱ्या स्फोटाची आणि विध्वंसाची पाहणी करणे हे होते. स्फोटानंतर मोठमोठ्या तेलकट मातकट थेंबांचा पाऊस पडू लागला. तो पाऊस खरा नव्हता तो महाभयानक किरणोत्सर्गी द्रवाच्या रुपाने कोसळणारा मृत्यूच होता.

चाळीस हजार फूट ऊंचीचा भूछत्रासारखा लोट प्रचंड वेगाने उफाळून वर येऊ लागला. हिरोशिमा शहर साठ टक्के बेचिराख झाले होते. ८०,००० लोक मरण पावले ७२,००० लोक किरणोत्सर्गामुळे जखमी झाले, भाजले.

तीन दिवसानंतर नागासाकी या दुसऱ्या शहरावर दुसरा ॲटमबाँब टाकण्याची जबाबदारी इथर्ले व त्याचे सहकारी यांनी पार पाडली. तेथेही असाच भयानक रुद्र संहार झाला. त्या कामगिरीतल्या इथर्लेच्या कोणत्याही सहकाऱ्याला पश्चात्ताप वाटला नाही. उलट त्यांना कर्तव्य पालनाचे समाधान मिळाले.

इथर्ले मात्र मनाने खचला. तो अबोल व कुढा बनला. त्याचा सत्कार केला गेला, तेव्हा त्याच्या डोळ्यांपुढे स्वतः पाहिलेला संहार उभा राहिला. तो सत्कार समारंभाच्या व्यासपीठावरून पळून गेला व गवतात जाऊन रडत बसला. या भयानक संहाराची जबाबदारी आपणावरच आहे असे त्याच्या मनाने घेतले. त्याला रात्री भयानक स्वप्नें पडत. भीतीने ओरडत हातपाय झाडीत घामाने डबडबून तो जागा होई. मग तो किंचाळू लागे. त्याच्या पत्नीने त्याला सावरण्याचा खूप प्रयत्न केला पण तो निष्फळ ठरला. तिने शेवटी त्याच्याशी घटस्फोट घेतला. इथर्ले आपणहून हॉस्पिटलमध्ये गेला. उपचार करून त्याला सोडल्यावर तो बारीक सारीक गुन्हे करु लागला. त्याचे वेड भयानक होते. अटकेतून सुटला की रुग्णालयात तेथून निघाला, की पुन्हा गुन्हे पुन्हा अटक असे चक्र सुरू झाले. सरकारने त्याला २३७ डॉलर्स पेन्शन दिले. तेव्हा तो चेक भिरकावून देत इथर्ले म्हणाला, 'खून केल्याचा हा बोनस आहे काय ? फेकून द्या तो चेक'.

त्याने दोनदा आत्महत्येचा प्रयत्नही केला. नागासाकी

हिरोशिमा येथील अमानूष संहाराला त्याने स्वतःला जबाबदार धरले व तो मनोरुग्ण झाला.

आज जगात पृथ्वी अनेकदा निर्मनुष्य होऊ शकेल अशी अण्वस्त्रे असून राजकारणी लोकांच्या डोक्यात थोडी जरी विकृती निर्माण झाली तर पृथ्वी बेचिराख होईल. आपण विनाशाच्या पूर्ण विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. कधी अणुयुद्ध होईल सांगता येत नाही. आपण धास्तावलेले आहोत. शांततेचा संदेश राजकारणी लोकांच्या डोक्यात कधीच शिरत नाही. याला आपण सर्व जबाबदार आहोत. शांततेचा आवाज म्हणावा तसा उठत नाही. इथर्ले काय वेडा होता ? नाही तो उच्च विचाराचा भावनाशील चिंतक होता. पण आपण युद्धखोर लोकांनी त्याच्यावर वेड्याचा शिक्का-मोर्तब केला. अजूनही संहारक अस्त्रात दिवसेंदिवस भर पडत आहे. कोठे चाललो आहोत आपण ? सर्वनाशाच्या शक्यतेची खात्री असूनही आम्ही सामान्य लोक थंड बसलो आहोत.

शांततेच्या दूतांचे आवाज युद्धखोर मनात शिरत नाहीत. शांततेचा आवाज दशदिशात घुमला पाहिजे.

□

## खिचडी पकाता हूँ ।

एकदा बादशहा व बिरबल तळ्याकाठच्या बागेमध्ये बसून गप्पा मारीत होते. सहज बादशहाने पाण्यात हात घातला. पाणी फारच थंड होते. बादशहा म्हणाला, 'या एवढ्या थंड पाण्यात कोणी उभा राहून दाखवील का ?'

बिरबल म्हणाला,' हे फार कठीण आहे. पण एकादेवेळी कोणी तरी इच्छाशक्तीच्या जोरावर उभा राहीलही.'

बादशहा म्हणाला, ' दवंडी द्या, की या तळ्यातील पाण्यात जो रात्रभर उभा राहील त्याला एक हजार मोहरा मिळतील.'

हजार मोहरा मिळाव्यात म्हणून पुष्कळ लोक आले. तास दोन तास पाण्यात उभे राहिले पण रात्रभर कोणी उभे राहिले नाही. एका गरीब माणसाच्या मनात आले एवीतेवी आपला संसार चालत नाहीच. उपासमार होतेय. भुकेने मरायचे तर, निदान पाण्यात उभे राहून जमले तर हजार मोहरा मिळवाव्यात. नाहीतर काकडून तेथेच मरून जाऊ. तो तळ्याकाठी आला व पहारेवाल्या सैनिकांना म्हणाला, ' मी तळ्यातल्या पाण्यात रात्रभर उभा राहून दाखवतो.' तो तळ्याच्या पाण्यात उभा राहिला. सकाळी पहारेवाल्या सैनिकांनी त्याला बाहेर काढले. तो काकडून बेशुद्ध झाला होता. थोड्या वेळाने तो शुद्धीवर आला. त्याला बादशहाकडे नेण्यात आले बादशहाने विचारले, ' याला कसली ऊब, कसली उष्णता मिळाली का ?'

तेव्हा ते मत्सरी सैनिक म्हणाले, ‘हा सारखा राजवाड्याच्या दिव्याकडे पहात होता.’

तेव्हा बादशहा म्हणाला, ‘अरे दिव्याची ऊब घेतलीस ना ? मग बक्षीस वगैरे काही मिळणार नाही. चल चालता हो.’

तो माणूस रडत रडत रस्त्याने जाऊ लागला. वाटेत लोकांनी त्याला सांगितले, की तू बिरबलाकडे जा. तो तुला योग्य मार्ग दाखवील. तो माणूस बिरबलाकडे गेला व त्याने सर्व हकीकत सांगितली. बिरबलाने त्याला अन्नवस्त्र देऊन चार दोन दिवस गप्प रहायला सांगितले.

एक दिवस बिरबलाने तीन ऊंच बांबू बांधून त्यावर तांदूळ, डाळ व पाणी घातलेले एक मडके बांधले व त्या ऊंचावर असलेल्या मडक्याखाली तो एक एक काडीचा जाळ करीत राहिला. इतक्यात त्याच्याकडे बादशहाचा शिपाई आला. बादशहाने बिरबलला ताबडतोब दरबारात बोलावले आहे असा निरोप सांगितला. बिरबलाने सांगितले ‘मी खिचडी शिजवतोय. ती शिजली की खाऊन लगेच येतो.’

थोड्या वेळात एक घोडेस्वार आला त्याने बिरबलला ताबडतोब बोलावल्याचे सांगितले. बिरबलाने पूर्वीचेच उत्तर दिले. शेवटी बादशहाने सांडणीस्वार पाठवला. बिरबलाने पुन्हा तेच उत्तर दिले. ‘खिचडी शिजतेय. झाली की खाऊन येतोच.’

तिसऱ्यांदा हा निरोप ऐकून बादशहा संतापला व स्वतः बिरबलाच्या घरी आला. बघतो तो ऊंच बांधलेल्या मडक्यासाठी खाली जमिनीवर बिरबल एक एक काडी जाळीत बसला आहे. बादशहा भडकून म्हणाला. ‘खिचडी करण्याची ही काय रीत

आहे ? ते मडके किती ऊंच आहे आणि एकेका काडीचा तू जाळ करतो आहेस. कशी त्याला उष्णता लागणार ? अशाने खिचडी कशी शिजणार ?'

बिरबल हात जोडून उभा राहिला आणि म्हणाला, ' सरकार, रात्रभर पाण्यात उभ्या राहिलेल्या माणसाला जर राजवाड्यातल्या दिव्याची ऊब मिळू शकते, तर माझ्या खिचडीला का नाही उष्णता मिळणार ? हे अंतर तर फार कमी आहे. ही खिचडी नक्की होईल व ती खाऊन मी लगेच दरबारात येतो.'

बादशहाला आपली चूक समजली. त्याने त्या पाण्यात उभ्या राहिलेल्या माणसाला बोलवायला सांगितले व त्याला दरबारात आणून हजार मोहरा दिल्या. ऊंची पोशाख दिला. सर्वांनी बिरबलाला धन्यवाद दिले.

जशास तसे या न्यायाने बिरबलाने बादशहाची चूक मोठ्या खुबीदारपणे दाखवून दिली.

जगात वागतांना जशास तसे वागावेच लागते, नाहीतर आपले पदोपदी नुकसान होते. दुसऱ्याचे दोष मार्मिकपणे खुबीदारपणे सांगितले, तर त्याला अपमान वाटत नाही. त्यासाठी तीक्ष्ण विनोदबुद्धी, बुद्धिचातुर्य, धोरणीपणा व व्यवहारज्ञानाची गरज आहे. बादशहा व बिरबल यांच्या कथा नेहमी डोळ्यांसमोर ठेवाव्यात म्हणजे बुद्धीचा विकास होईल.

□

## कोण किती सुखी ?

श्री गोंदवलेकर महाराजांनी कोण किती सुखी आहे याबद्दल एक फार मार्मिक गोष्ट सांगितली आहे.

एका गावात एक ब्रह्मचारी गावाबाहेरील वेशीसमोर मारुतीच्या देवळांत रहात होता. तो भिक्षा मागे, साधना करीत असे व देवाच्या अखंड नामस्मरणात आपला काल उत्तमपणे व्यतीत करीत असे. एकदा त्याच देवळात एक सावकार रहायला आला. त्याचेजवळ घोडा गाडी, नौकर चाकर यांची समृद्धी होती. ब्रह्मचाऱ्याला वाटले, की हा सावकार किती सुखी असेल ? त्याने त्या सावकाराजवळ जाऊन विचारले,' आपण सुखी आहात ना ?' तो सावकार म्हणाला, ' नाही हो ! मी कसला सुखी. माझे जवळ संपत्ती वैभव सारे काही आहे ' पण मला मूलबाळ नाही याचे मला फार मोठे दुःख आहे. तो अमक्या गावचा श्रीमंत गृहस्थ आहे तो फार सुखी आहे. कारण त्याचेजवळ संपत्ती वैभव वगैरे असून त्याला चार मुले आहेत. तो खरा सुखी !' तो ब्रह्मचारी त्या गावातील श्रीमंत माणसाकडे गेला व त्याला विचारले, 'आपण सुखी आहात ना ?' तो श्रीमंत माणूस म्हणाला, ' छे हो ! मला सर्व वैभव आहे. चार मुलेही आहेत, पण मजजवळ विद्या नाही. माझी मुलेही शिक्षणाची टाळाटाळ करतात. त्यामुळे मला सुख नाही. त्या अमक्या गावी एक पंडित आहे त्याच्या विद्वत्तेला सारेजन मान देतात. तो खरा सुखी ! ' ब्रह्मचारी त्या पंडिताच्या गावी गेला व त्याने त्याला विचारले, 'आपण सुखी

आहात ना ?' पंडित म्हणाला, 'नाही हो ! माझी विद्वता जगात मान्यता पावली हे खरे, पण काय करायचे तसल्या मान्यतेला. खूप कष्ट सोसून मी विद्या कमावली, पण मला पोटापुरते अन्न मिळणे देखील कठीण जाते. त्या अमक्या गांवात एक पुढारी आहे त्याचेजवळ विद्या, संपत्ती, मुलेबाळे, मान्यता सारे काही आहे. तो खरा सुखी !' ब्रह्मचारी त्या पुढाऱ्याच्या गांवी गेला आणि त्याने त्याला तोच प्रश्न विचारला, 'आपण सुखी आहात ना ?'तो पुढारी म्हणाला,' मी सुखी आहे असे लोकांना वाटते, पण ते खोटे आहे हो ! मजजवळ पैसा, लौकिक, ज्ञान, मुलेबाळे सारे काही आहे, पण पुढारी म्हणून लोकांना सांभाळण्यासाठी फार यातायात करावी लागते. एवढे करुनही विरोधकात माझी फार निंदा होते ती वेगळीच ! या निंदेचे मला अतिशय दुःख होते. तुम्हाला खरा सुखी माणूस पहायचा आहे का ? मग मी ज्या एका सुखी माणसाची कीर्ती ऐकली आहे त्याला जाऊन भेटा !'

ब्रह्मचाऱ्याने कान टवकारले. तो पुढारी सांगू लागला, 'त्या अमक्या गावात, वेशीबाहेरच्या मारुतीच्या देवळात एक ब्रह्मचारी राहतो.तो भिक्षा मागतो, देवाची उपासना करतो आणि मस्त आनंदात राहतो. त्याला माझ्यासारखे कसलेही दुःख नाही ! तो ब्रह्मचारी खरा सुखी !'

हा पुढारी आपलेच वर्णन करतो आहे हे त्या ब्रह्मचाऱ्याच्या लक्षात आले. तो अतिशय संकोचला आणि मुकाटयाने तिथून निघून गेला.

माणूस कोण किती सुखी आहे यांची तुलना करतो, या तुलनेतच सारे दुःख दडलेले आहे. आपल्यापेक्षा कमी सुखी लोकांची

तो तुलना करीत नाही, तर जे आपल्यापेक्षा जास्त सुखी वाटतात त्यांच्याशी आपली तुलना करून अकारण मानसिक दुःख करून घेतो. आपल्याला भोवतालच्या परिस्थितीत कसे वागले पाहिजे याचे भान झाल्यावर त्या कर्तव्यपूर्तीतच सारे समाधान आहे हे माणूस सोयिस्कर-पणे विसरतो.सुख ही मोजण्याजोगी तुलना करण्याजोगी गोष्टच नव्हे, दुःखाप्रमाणेच सुख देखील मनातच उपजते आणि मावळते. म्हणजे आपण परमसुखी होण्याचेही आपल्याच हातात आहे. सुखासाठी कोठेही वणवण फिरण्याचे कारण नाही. सुख मिळविणे ही एक कला आहे.

□

९५६३
विषय ३१/१/८४

## दुर्बलांना मदत

कोल्हापूरचे राजे राजर्षि शाहू महाराज हे एक तळमळीचे राजे होऊन गेले. कोल्हापूर संस्थानात त्यांनी पुष्कळच सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या कार्यात शिक्षण सुधारणा, अस्पृश्योद्धार दुर्बलांना मदत, धर्म सुधारणा या गोष्टी ठळकपणे दिसून येतात. त्यांच्याबद्दल एक गोष्ट अशी सांगतात.एकदा एका प्रगत समाजाच्या पुढाऱ्याने त्यांना विचारले ' महाराज, आपण शिक्षण क्षेत्रात दुर्बलांना मदत करता, उच्चवर्णीयांना करीत नाही असे का ? सामाजिक जीवनात आपण अस्पृश्यांना मदत करता, पण वरिष्ठ वर्गाला काहीहो मदत करीत नाही असे का ? धर्मकारणात ढवळाढवळ करुन उच्चवर्णीयांना बाजूस सारून आपली स्वतःचीच मते योग्य असे का मानता ?'

शाहू महाराजांनी त्या सद्‌गृहस्थाला घोड्याच्या तबेल्याकडे नेले व एक पोते हरभरे आणावयास सांगितले. नोकरांनी सांगितल्याप्रमाणे एक पोते हरभरे आणून तबेल्यात मध्यभागी ते ओतून दिले. नंतर शाहू महाराजांनी तब्येल्यातल्या सर्व घोड्यांना सोडून द्यावयास सांगितले. सर्व घोडे सुटताच जे घोडे बलवान होते त्यांनी दुर्बल घोड्यांना मागे सारले आणि हरभरे स्वतः भराभर खाण्यास सुरुवात केली. सर्व बलिष्ठ घोडे हरभरे खात होते, दुर्बल घोडे नुसतेच बाजूला राहिले. त्यांना हरभरे मिळालेच नाहीत.

शाहू महाराज म्हणाले, 'पाहिलेत ? बलिष्ठ घोड्यांनी दुर्बल

घोड्यांना हुसकावून लावले. त्यांना काही मिळाले नाही. समाजात जे लोक पुढारलेले आहेत. सुशिक्षितपणाची परंपरा लाभलेले आहेत, जे पोटभर जेवू शकतात अशांच्यासाठी राजाने काही करण्याची जरुर नाही. उच्च वर्णीय आपोआपच पुढे जात आहेत. पण अस्पृश्य, दुर्बल यांना शिक्षण कोण देणार ? म्हणून मी समाजातल्या दुर्बल घटकांना मदत करतो. त्यांचा वाली कोण आहे ?'

शाहू महाराजांनी दाखवून दिले की,प्राण्यामध्येदेखील 'बलिष्ठ जगती दुर्बल मरती' असा न्याय आहे. बुद्धिमान माणसांमध्येही स्वार्थ साधणे हे ध्येय असते.

जेव्हा राजा आपल्या प्रजेतील दुर्बल लोकांना मदत करतो तेव्हा त्याच्या मनात सामाजिक समतेचा विचार प्रकर्षाने असतो. पुढारलेल्या वर्गाचा माणूस पुढेच जाणार. राजाला सर्व प्रजा सारखी असते. सर्वांना समान संधी देणे योग्य खरे, पण अस्पृश्य व दुर्बल लोकांना जास्त संधी दिली पाहिजे. वर्षानुवर्षे अस्पृश्यतेमुळे त्यांनी खूप सोसले आहे. जो धर्म माणसामाणसामध्ये अस्पृश्यता पाळतो तो धर्म धर्मच नव्हे. सारी माणसे सारखीच. मानवतावादाला कोणत्याही प्रकारची विषमता मान्य होणारी नाही. राजर्षि शाहू महाराजांनी हे जाणून दुर्बलांना मदत केली त्यांच्यासाठी बोर्डिंगे काढली. शाहू महाराज दुर्बलांचे पोशिंदे होते म्हणून त्यांनी दुर्बलांसाठी अमाप कार्य केले व आपल्या वर्तनाने खरा राजा कसा असावा हे दाखवून दिले.

□

## श्रमाची प्रतिष्ठा

आज आपल्या समाजात शारीरिक श्रमांना प्रतिष्ठा उरलेली नाही. जो तो भपकेबाजपणा, साक्षरता, उच्च शिक्षण, अधिकार यांना मानतो पण श्रम कितीही हलके असोत त्यांना प्रतिष्ठा आहे हे लक्षात घेतले की, पांढरपेशा श्रीमंत, कामकरी, मजूर असे खोटे भेद आपल्याकडून होणार नाहीत.

अब्राहम लिंकन श्रमांना फार प्रतिष्ठा देत असे. स्वतःचे काम स्वतः करण्यात त्याना फार आनंद वाटत असे. एकदा अब्राहम लिंकन स्वतःचे बूट स्वतः पॉलिश करीत बसला होता. एवढ्यात एक धनाढ्य अमेरिकन गृहस्थ त्याला भेटायला आला. लिंकन स्वतःच बुटांना पॉलिश करतांना पाहून त्याला फार विस्मय वाटला. त्याने विचारले, 'अध्यक्ष महाराज, आपण आपल्या बुटांना स्वतःच पॉलिश करता ?' हजरजबाबी लिंकनने तत्क्षणी उत्तर दिले. 'होय मी स्वतःच माझ्या बुटांना पॉलिश करतो ! तुम्ही कुणाच्या बुटांना पॉलिश करता ?' त्या धनाढ्य गृहस्थाचे तोंड पाहण्यासारखे झाले.

साने गुरूजी श्रमांना फार प्रतिष्ठा देत. ते म्हणत 'एक हात भू नांगरणे शत व्याख्यानांहून थोर ! संडास झाडणे एक तप पंडित्याहून थोर ' श्रमांना प्रतिष्ठा दिल्यानेच माणूस थोर होतो. आपले पंतप्रधान मोरारजीभाई देसाई शिपायाकडून कधीही स्वतःची खाजगी कामे करुन घेत नाहीत त्याला फक्त ऑफिसचे काम सांगतात.

श्रमदान फॅशन म्हणून केले जाऊ नये. कुदळ हातात घेतलेला

फोटो छापून येण्यासाठी श्रमदान केले जाऊ नये. पायात घातलेले दगड कधी तक्रार करीत नाहीत की, आम्हाला कोण ओळखणार म्हणून ! आपल्या भारतात अफाट मनुष्यशक्ति आहे. पण श्रमांना प्रतिष्ठा नाही म्हणून कोटयावधी तास रोज वाया जात आहेत. राजकीय पुढाऱ्यांना खुर्ची टिकविण्यासाठी सारा वेळ घालवावा लागतो. सामाजिक सुधारणावाद्यांना प्रसिद्धीची हाव असते म्हणून त्यांचे श्रमांना प्रतिष्ठा देण्याचे काम स्वार्थमूलक आहे. या देशात अगदी मुळीच गाजावाजा न करता श्रमांना प्रतिष्ठा देणारे लोक दुर्देवाने फार कमी आहेत. साऱ्यांनाच पुढारी व्हावयाचे आहे कोणालाही केवळ कार्यकर्ता म्हणून रहायचे नाही. कार्यकर्तेपण, पुढारीपण मिळविण्यासाठी राबवावयाचे आहे. परिणामी, सर्वत्र दंभ दिसतो. श्रमदानाचे, श्रमाच्या प्रतिष्ठेचे तत्त्व सामान्य माणसाच्या, विद्यार्थ्यांच्या अंगी रुजवले पाहिजे. श्रमदान हे जीवनाचे तोरण झाले पाहिजे, तोंडातून एकही शद्ब न काढता श्रमदानाचे डोंगर उभे राहिले पाहिजेत. जे देश मोठे झाले त्यांनी श्रमाच्या प्रतिष्ठेला फार जपले आहे. पायामधल्या दगडाप्रमाणे असंख्य लोकांचे श्रम राष्ट्रउभारणीला हवे आहेत. आपण आपल्यापासूनच ही मूक सुरुवात नको का करायला ? कोठल्याही कौतुकाची अपेक्षा न बाळगता !

□

## वैराग्य कसे उपजते ?

सर्व धर्मात वैराग्य पाहिजे असे म्हटले आहे. वैराग्याने मोक्षासाठी साधना फलद्रुप होते असे सांगण्यात येते. जोपर्यंत मानवाच्या मनाची कवाडे सताड उघडी नाहीत. स्वच्छ नाहीत. तोपर्यंत वैराग्य उपजणे शक्य नाही. अखंड सावधानता पाळली तर वैराग्य निश्चित निर्माण होईल. सत्य प्राप्ती किंवा ईश्वरप्राप्ती वैराग्याच्या आधीन आहेत. अखंड सावधानता असेल तर आपण पळवाटा शोधीत बसत नाही. अशी अखंड सावधानता गौतम बुद्धाजवळ होती. वडिलांनी गौतमाला दुःख दिसू नये म्हणून जनसंपर्कात न जाऊ देता खूप विलासात ठेवले. पण एकदा नगरपाहणीसाठी गौतम रथातून निघाला. रस्त्याच्या कडेला एक वृद्ध कुबड आलेला काठी टेकीत टेकीत खोकत चाललेला दिसला. तोवर गौतमाने वृद्ध पाहिलेलाच नव्हता त्याने सारथ्याला विचारले, ' तो माणूस असा का काठी टेकीत खोकत चालला आहे ? तो कोण व असा का ? ' सारथी म्हणाला, ' महाराज, तो वृद्ध झाला आहे. रोगाने ग्रस्त आहे ' तो पुढे असेही म्हणाला ' आपल्या सर्वांचे असेच व्हायचे आहे. आपणही एक दिवस असेच म्हातारे होणार '

वार्धक्य, रोग पाहण्याचा गौतमाचा हा पहिलाच प्रसंग. त्याचे मन विषण्ण झाले.

पुन्हा एकदा गौतम नगर पहाणीसाठी बाहेर पडला. त्याला एक प्रेत दिसले. एका ताटीवर माणूस बांधला होता.त्यावर कापडाचे

आच्छादन होते. रंगीबेरंगी फुले उधळली जात होती. गौतमाने सारथ्याला विचारले ' हे काय आहे ? त्या माणसाला बांबूवर बांधून का व कोठे नेत आहेत ? '

सारथी म्हणाला, ' महाराज हा माणूस मरण पावला आहे. त्याला हे लोक स्मशानात नदीकाठावर नेत आहेत. तेथे नेऊन ते त्याला जाळणार आहेत. आपण सर्वच एक दिवस मरणार आहोत आणि आपलीही अशीच स्थिती होणार आहे.' गौतमाने रथ परत राजवाड्यात न्यायला सांगितले. मागच्या वेळेपेक्षाही त्याला जास्त विषण्णता आली.

नंतर काही दिवसांनी गौतम पुन्हा नगर पहाणीसाठी गेला. तेव्हा भगवे कपडे घातलेले व मुंडन केलेले काही लोक दिसले त्याने सारथ्याला विचारले. ' हे लोक कोण आहेत ?'

सारथी म्हणाला, ' महाराज या लोकांना संन्यासी म्हणतात. यांनी सर्व गोष्टींचा त्याग केला आहे व त्यांचे ध्येय मुक्ती मिळवणे व आनंद मिळवणे हे आहे. हे फार निस्पृह असतात. यांना या क्षणभंगुर जगात अर्थ वाटत नाही.'

गौतम राजवाड्यात परत आला. वृद्ध रोगी आणि मेलेला माणूस पाहून त्याच्या हृदयाला पीळ पडलाच होता. गौतम अंतर्मुख झाला. हे असे का ? हा महाकठीण प्रश्न त्याच्या मनात घर करून बसला. खऱ्या अर्थाने त्याला मरणाची जाणीव झाली. विचार करकरून तो थकला.

गौतमाला यशोधरा नावाची सुंदर पत्नी व राहूल नावाचा गोंडस मुलगा होता. गौतमाच्या वडीलांनी त्याला दु:ख दिसू नये म्हणून आटोकाट प्रयत्न केला होता, पण आता गौतमाला सारे जग

असार वाटू लागले. सर्वांचा त्याग करून त्याने वनाचा रस्ता धरला. त्याला कोणी थोपवू शकले नाही. त्यानंतर त्याने अनेक प्रकारची साधना करून त्यातले तत्त्थ्य व अतत्त्थ्य शोधून काढले. त्याने संन्यास घेतला आणि त्याला ज्ञानप्राप्ती झाल्यावर लोक त्याला बुद्ध मानू लागले. आपल्याला मिळालेले ज्ञान सर्वसामान्य लोकांना प्राप्त व्हावे म्हणून त्याने उपदेश करीत भ्रमंती केली.

आम्ही आमचे कोणी नातेवाईक वारले तर त्याला स्मशानात जाळून निर्लेप मनाने घरी परत येतो. काहींना तात्पुरते म्हणजे चिता जळत असतांना वैराग्य येते पण ते टिकत नाही. पुन्हा संसार मग्नता सुरू होते. आपण अमर असल्यासारखे वागतो. बुद्धाला सामान्य माणसाबद्दल अपार करूणा होती. मरणावर चिंतनाने मात केल्यावर बुद्धाने निर्वाणप्राप्तीचा मार्ग जगाला सांगितला. उण्यापुऱ्या शंभर वर्षाच्या आयुष्यात अगणित दुःखे आहेत पण तरीही निर्वाण म्हणजे मोक्ष मिळू शकतो. हा बुद्धाचा संदेश आहे. आपणच आपले दीपस्तंभ व्हा असे तो म्हणत असे. बुद्धाने नवीन धर्म स्थापन केला. निर्वाण प्राप्तीची शक्यता प्रत्येकालाच आहे असे सांगून बुद्धाने अंधाऱ्या जगाला आनंदाचा मार्ग दाखवला.

□

## सुखदेव, भगतसिंग व राजगुरु

१९२१ साली शासन व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी सायमन कमिशन नेमण्यात आले. पण निदर्शकांनी 'सायमन गो बॅक' अशा घोषणा देऊन सायमन साहेबाची पूर्ण निराशा केली. लाहोरला असाच एक मोर्चा निघाला होता. मोर्चाचे नेतृत्व लाला लजपतराय यांच्याकडे होते. या मोर्चावर अमानुष लाठीहल्ला करण्यात आला. लालाजी लाठीमाराने बेशुद्ध झाले. त्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले पण तेथे ते मृत्यू पावले. या निर्घृण हत्येच्या निषेधासाठी जालियनवाला बाग येथे एक निषेध सभा भरली. जनरल डायर याने सभास्थानाची चारी बाजूंनी नाकेबंदी केली. अश्रुधूर सोडला व धडाधड लोकांवर गोळीबार केला. शेकडो लोक पुरुष, स्त्रिया, मुले गोळ्या लागून तडफडत मेली. इंग्रजांच्या या अत्याचाराने तरूण वर्ग फार संतप्त झाला. अशा चिडलेल्या, चिघळलेल्या अवस्थेत पंजाबचा भगतसिंग, बंगालचा सुखदेव व महाराष्ट्राचा राजगुरु एकत्र आले. मनात सूडाची भावना होती आणि स्वातंत्र्याची आस! तिघांनी मिळून कट केला. सँढर्स्ट साहेबाला ठार मारण्याचा! दयानंद कॉलेज पिछाडीला होते. पुढे पोलीस ठाणे होते. दुपारी सँढर्स्ट फटफटी-वरून घरी जायला निघाला की, त्याला मारण्याचा कट शिजला. तिघेही जण पाळतीवर राहिले. दुपारी सँढर्स्ट पोलीस ठाण्यातून बाहेर आला व फटफटीवरून निघाला. भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांच्या खाणाखुणा झाल्या. सँढर्स्ट हमरस्त्यावर येताच धडाधड बार

झाला. राजगुरु भिकाऱ्याच्या वेषात होता. त्याच्या पिस्तुलाने काम बजावले होते. सँढर्स्ट ठार झाला. लगेच पोलीस धावले. त्यांनी शहराची नाकेबंदी केली. गुप्तपणे सुखदेव व राजगुरु पळाले पण भगतसिंग मात्र लाहोरातच अडकला. एका खुनाने स्वातंत्र्य मिळणार नाही हे तिघेही जाणत होते. पण त्यांना ब्रिटिशांना जाग आणायची होती. सँढर्स्ट ठार होताच खून, बँकेची लुटालूट, दारूगोळ्याची लुटालूट यांना ऊत आला. ब्रिटिशांनी सँढर्स्टचा खुनी पकडून देण्यासाठी पाच हजार रुपयांचे बक्षीस लावले. लाहोरच्या नाकेबंदीतून भगतसिंगला सुटायचे होते. त्याला एका मुसलमान जोडप्याने मदत केली. मोमिनाबादचे नबाब व त्यांचा झनाना रेल्वेने जायचा होता म्हणून त्यांनी स्टेशनमास्तरचा हात ओला केला व सबंध डबा रिझर्व झाला. भगतसिंग दाढी लावून मोमिनाबादचा नबाब बनला. स्टेशनवर बिबीच्या खांद्यावर हात ठेऊन बरोबर बाकीचा झनाना घेऊन भगतसिंग नबाबाच्या ऐटीत आपल्या रिझर्व डब्यात जाऊन बसला. सी. आय. डी. च्या डोळ्यात धूळ फेकून भगतसिंग लाहोरमधून सटकला.

पुढे एप्रिल १९२९ रोजी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी दिल्ली असेंब्ली गाठली आणि तेथे भर असेंब्लीत प्रेक्षकांच्या गॅलरीतून बाँब फेकला. सारे पळाले. प्रेक्षकांच्या गॅलरीत फक्त भगतसिंग राहिला. सिक्युरिटी ऑफिसर आला. त्याला भगतसिंग म्हणाला, 'हे पिस्तूल घ्या. मी तुम्हाला मारणार नाही. तुम्ही मला अटक करू शकता.' भगतसिंग स्वतःहून अटक झाला. लाहोरचा कट उघड झाला नव्हे त्याने केला. देशाला जागे करण्यासाठी सुखदेव, राजगुरु व भगतसिंग यांना अटक झाली. त्यांच्यावर खटला भरण्यात आला.

तिघांनाही फाशीची शिक्षा झाली. सारा देश हळहळला. सेनापती बापटांनी लाखो सह्यांचा अर्ज व्हाइसराय आयर्विनकडे पाठवला. मोतीलाल नेहरूंनी आयर्विनला भेटून या तिघांना फासावर न देण्याची विनंती केली. आयर्विनने या तिघांनी दयेचा अर्ज करावा अशी मोतीलालना सूचना केली. मोतीलाल त्यांना भेटण्यास गेले व चाचरत चाचरत त्यांनी आपल्या येण्याचा उद्देश सांगितला. भगतसिंग त्वेषाने म्हणाला, 'दया ? भीक ? ब्रिटीश लोकांकडून ? मोतीलालजी हमे मरकर जीना है । जीते जीते मरना नही । हमे दया नही चाहिये । हम फासीके तख्तपरही चढ जायेंगे ।' मोतीलालजी हताशपणे परत आले. पण त्या क्रांतीवीरांचा त्यांना अभिमान वाटला. फाशीचा दिवस ठरला. उजाडला. पहिल्यांदा कोण फाशी जाणार याबद्दल या तिघांत वाद झाला. पण जेलचे अधिकारी थोडेच मानणार होते ? हात मागे बांधून, डोळ्यांवर काळी टोपी घालून गळ्यात त्यांच्या फास घातला गेला. पायाखालची फळी ओढली गेली. एकच आचक्याचा आवाज झाला आणि तिघेही मेले. स्वातंत्र्याच्या प्रेमाने भारावलेल्या तीन कोवळ्या तरुणांच्या प्राणज्योती मावळल्या पण जाता जाता त्यांनी असंख्य ज्योती पेटवल्या.

हा भारत देश कपोत पक्ष्याच्या मासाइतके अंगचे मास पारध्याला देणाऱ्या शिबी राजाचा वारसा सांगतो. हा भारत देश स्वप्नात दिलेले वचन खरे करण्यासाठी हालहाल झाले तरी प्राणाचीही पर्वा न करणाऱ्या हरिश्चंद्राचा वारसा सांगतो. वारसा मोठा आहे. वादच नाही पण रणाविण स्वातंत्र्य कोणाला मिळाले हेही लक्षात ठेवले पाहिजे. अनेक प्रकारच्या लोकांनी विविध साधने वापरुन आपल्या देशाचे स्वातंत्र्य मिळवले आहे. अनेकांच्या प्रयत्नाने अनेकांच्या

कुर्बानीमुळे आपण स्वतंत्र झालो याची जाणीव ठेवून आपण वागले पाहिजे. भ्रष्टाचार निर्मूलन झाले पाहिजे. उत्पादन वाढीसाठी कष्टाळू झाले पाहिजे. अन्यथा, बलिदान केलेल्या स्वातंत्र्यवीरांचे आत्मे तळमळतील.

□

## बहुमताचा कारभार जपून करावा

आज आपण हरघडी निरनिराळ्या संस्था, नगरपरिषदा, विधानसभा आणि विधानपरिषद, संसद व राज्यसभा यांच्या कामकाजाचे वृत्त रेडिओ आणि वृत्तपत्र यातून ऐकतो हा बहुमताचा कारभार आहे. लोकशाही पद्धतीने बहुमताप्रमाणे राज्यकारभार ही तात्त्विक दृष्टया अत्यंत प्रगल्भ विचारसरणी आहे. पण राजकारणात काही फार ज्ञानी लोक शिरत नाहीत हेही आपण पहातो.

फार वर्षांपूर्वी एका जंगलातून तीन ब्राह्मण जात होते त्यांना फार तहान लागली होती पण, पाणी मिळेना म्हणून त्याचा जीव कासावीस झाला. भिरभिर भटकतांना शेवटी त्यांना एक विहीर दिसली पण पाणी फार खोल होते. त्या विहिरीतून पाणी कसे काढायचे या विचाराने ते हैराण झाले. शेवटी एकाला युक्ती सुचली तो म्हणाला, ' आपण आपल्या तिघांचे पटके एकत्र बांधू व त्यांच्या टोकाला पायातला जोडा बांधू म्हणजे लांब दोरी तयार होईल व जोडयातून पाणी काढता येईल. मिळेल तेवढे पाणी पिऊन तहान भागवू. ' दुसऱ्याला ही कल्पना पसंत पडली पण तिसरा म्हणाला, ' जोडयातून पाणी पिणे ब्राह्मणाला निषिद्ध आहे. मी असले जोडया-तले पाणी मुळीच पिणार नाही. उलट, गावात परत गेल्यावर तुम्ही जोडयाने पाणी प्यालात म्हणून सांगेन ' पण तहानलेल्या त्या दोघांनी तिसऱ्याचा पटका ओढून घेतला. तीन पटके एकत्र बांधून टोकाला जोडा बांधला व विहिरीतून पाणी काढून ते दोघे मनसोक्त

पाणी प्याले. नंतर गावी परत येताच त्या दोघांनी जोडयाचे पाणी प्यायले होते त्यांनीच सर्वत्र पुकारा केला की, त्या तिसऱ्या ब्राह्मणानेच जोडयाने पाणी प्याले आहे. लगेच तेथील लोकांनी त्या तिसऱ्या निरपराध ब्राह्मणावर आळ घेतला व त्याला वाळीत टाकले. बहुमतामुळे लोकांनी ते मानले. असा असू शकतो बहुमताचा कारभार !

लोकशाहीचा कारभार बहुमताने चालतो त्यात वावगे काही नाही. पण कित्येकदा ज्ञानी माणसाचा सल्ला घेण्यात येत नाही. किंवा तो डावलला जातो. लोकशाहीची काही गृहीते आहेत. त्यातला प्रत्येक माणूस सुजाण पाहिजे. पैसा, धर्म, जात, पंथ यांना आवाहन करून कोटयवधी रुपयांचा खर्च करून निवडून येणे भूषणावह मानले जाते. पण अशा निर्वाचित लोकांनी ज्ञानी माणसाकडे आपण-हून जाऊन त्यांचा सल्ला घेतला पाहिजे. आपण मत देतो ते कोणाला कशासाठी देतो हे जर बहुसंख्यांना माहीत नसेल तर अनावस्था माजेल. लोकशाहीत अल्पसंख्यांकांवर अन्याय होता कामा नये. तरच बहुमताचा कारभार स्वीकारणे योग्य होय.

□

## पराकोटीचे आशावादी जीवन

दैनंदिन व्यवहारात हरघडी तत्त्वज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे अन्यथा, तत्त्वज्ञान म्हणजे मोठमोठ्या न कळणाऱ्या शद्बांचे अवडंबर होय.

एपिक्युरस नावाचा ग्रीक तत्त्वज्ञ शाळेत असतांना फार चौकस आणि कुशाग्र बुद्धीचा विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता.तो नेहमी विचारमग्न असे, एकदा त्याने गुरुजींना विचारले- ' गुरुजी, ही पृथ्वी कोणी केव्हा व कशी निर्माण केली. ?'

गुरुजींना या प्रश्नाचे उत्तर देता येईना. ते म्हणाले, ' या प्रश्नाचे उत्तर आजवर कोणालाच देता आलेले नाही. सध्याही कोणी उत्तर देऊ शकत नाही आणि पुढेही या प्रश्नाचे उत्तर कोणी देऊ शकणार नाही.'

एपिक्युरस म्हणाला,' थांबा,थांबा गुरूजी. तुमची पहिली दोन विधाने खरी असतील. पूर्वी किंवा आताही या प्रश्नाचे उत्तर कोणी देऊ शकले नाही, पण पुढेही कोणी या प्रश्नाचे उत्तर देऊ शकणार नाही हे आपले विधान खोटे आहे '

गुरुजी म्हणाले ' कशावरुन म्हणतोस ?'

एपिक्युरस म्हणाला,' या पुढील काळात मी आहे ना या प्रश्नाचे उत्तर द्यायला. मी शोधून काढीन उत्तर या प्रश्नाचे.'

भूतकाळात किंवा वर्तमानकाळात नैराश्य आले किंवा येत

असेल तरीही भविष्यकाळाबद्दल आपण सदैव आशावादी असले पाहिजे. तरच या जगण्याला आधार व अर्थ आहे. दुःख, नैराश्य, अशांतता ही सर्वत्र दिसणारी स्थिति आहे. पण हे सांगायला तत्त्वज्ञान कशाला पाहिजे ? अशाही स्थितीत भविष्यकाळाकडे नजर ठेवून एपिक्युरसप्रमाणे आशावादी भरारी मारलीच पाहिजे मग जीवन क्षणाक्षणाला साफल्याचे वाटेल.

□

## रामशास्त्री व थोरले माधवराव

थोरले माधवराव पेशवे अत्यंत कर्तबगार होते. राजकारणाची लहान वयातच त्यांना चांगली समज आली होती. त्यावेळी महाराष्ट्रात आपापसातील बेदिली व परकीयांशी युद्ध यामुळे बेबंदशाही माजली होती. थोरल्या माधवरावांनी या दोन्ही गोष्टींचा बंदोबस्त केला. ते अतिशय धार्मिक होते. दिवसातला बराच वेळ ते धार्मिक विधी किंवा कर्मकांडातच घालवीत. परमेश्वराच्या इच्छेने आपण राजवैभव उपभोगतो अशी त्यांची धारणा होती. दिवसेंदिवस त्यांचा धर्मनिष्ठपणा, विधी व कर्मकांड, पूजाअर्चा वाढतच चालले.

रामशास्त्री प्रभुणे हे पेशवाईतील एक निस्पृह, स्पष्ट वक्ते व कर्तव्यकठोर न्यायाधीश होते. राजकारणातल्या सल्ला मसलतीला त्यांचा फार उपयोग होई. रामशास्त्री कामानिमित्त माधवराव पेशव्यांना भेटायला जात. तेव्हा पेशवे पूजेत आहेत असे उत्तर मिळे. असे बऱ्याच वेळी झाले. एके दिवशी संधी पाहून रामशास्त्री पेशव्यांना म्हणाले, ' श्रीमंत आपण राज्यकर्ते आहात. आपण ब्राह्मण असला तरी क्षत्रियांचे राजकारण आपण स्विकारले आहे. आपली पूजाअर्चा क्षत्रियांच्या कर्तव्यात बसत नाही. आपल्या पूजेमुळे मला व इतर अनेकांना आपल्या भेटीसाठी तिष्ठत बसावे लागते आहे. अशाने राजकारण होत नसते. तुम्हाला देवदेवच करायचा असेल तर आपण दोघेही राज्यकारभार सोडून काशीला जाऊ व दोघेही फक्त पूजा पुरःश्चरण करीत राहू. देवपूजेत आपला बराचसा काळ गेला तर

राज्यकारभारावर अनिष्ट परिणाम घडेल. म्हणून आपण आपले धार्मिक विधी, पूजा, जप हे कमी करुन राज्यकारभाराकडे जास्त लक्ष द्या.'

रामशास्त्रींचा हा स्पष्ट सल्ला ऐकल्यावर थोरल्या माधवरावांनी त्याप्रमाणे सुधारणा केली व राज्यकारभाराची धुरा चांगल्या तऱ्हेने सांभाळण्यास सुरुवात केली. रामशास्त्री इतके बोलले त्याचा मनात राग न धरता त्यांच्याबद्दल आदरच बाळगला.

व्यवहारात वागतांना आपण पुष्कळदा कर्तव्य विसरून फाफटपसाऱ्यात अडकतो. परिणामी समस्या सुटत नाहीत व गुंता जास्त वाढतच जातो. राज्यकर्ते असमंजस असतील तर, प्रजेच्या दुःखाला पारावार रहात नाही. राज्यकर्त्यांनी समाजातील सर्व घटकांचे बारकाईने निरीक्षण केले पाहिजे. आपला सर्व वेळ प्रजेचे हित-अहित बघण्यात घालवला पाहिजे. वैयक्तिक मुक्तीच्या नादी लागून राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करणे क्षम्य नाही. राज्यकर्ते प्रजेच्या हिताचे भान विसरले म्हणजे, स्वतःच्याच चैन विलासात त्यांचा वेळ जातो. राज्यकर्त्यांना विविध प्रकारचा सल्ला देणारी निस्पृह लोकांची समिती पाहिजे. विद्वान, समतोल व दूरदर्शी विचारांचे लोक त्या समितीत असले पाहिजेत. मुख्य म्हणजे अशा विद्वत् समितीचा सल्ला राजकारणात अंमलात आणला गेला पाहिजे.

लोकशाहीमध्ये विद्वान, ज्ञानी, चतुर आणि व्यवहारतज्ञ लोकांबद्दल आदर असला पाहिजे. त्यांचा सल्ला मानला तरच राज्यकारभाराचा गाडा नीट चालेल. निरनिराळे आयोग नेमून घटनेतील मर्म जाणले पाहिजे. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. निवडून आलेल्या प्रतिनिधींना मार्गदर्शन करणारे लोक हवेत. नाहीतर झुंडशाही

निर्माण होईल. आजकाल रामशास्त्रींसारखे धुतल्या तांदळासारखे निस्पृह न्यायाधीश हवे आहेत.त्यांचा सल्ला राज्यकर्त्यांनी मोडू नये. अन्यथा लोकशाहीच्या नावाखाली हुकुमशाही येण्याचा फार मोठा धोका आहे.

□

## सत्यवचनी भीष्माचार्य

महाभारतात एक फार मार्मिक घटना घडली व ती तशी घडली नसती तर महाभारताला वेगळे वळण लागले असते. कौरव पांडवांच्या युद्धात भीष्माचार्य कौरवांचे प्रथम सेनापती होते. ते अतिशय शूर, सत्यवचनी, तेजस्वी व इच्छामरणी होते. ' अर्थस्थ पुरुषो दासः ।' असे म्हणून त्यांनी कौरवांचा असत्पक्ष का धरला ते कळत नाही.

युद्धाच्या पहिल्या काही दिवसात पांडवांचा पराभव होईना असे पाहिल्यावर दुर्योधन चिडला व भीष्मांच्या छावणीत येऊन तो त्यांना वाटेल तसे बोलला. त्यामुळे भीष्म चिडले व त्यांनी प्रतिज्ञा केली की, 'उद्या सूर्यास्तापर्यंत पांडव तरी मरतील, किंवा मी तरी मरेन.' ही भीष्मप्रतिज्ञा होती.

त्रिकालज्ञ श्रीकृष्णाला ही भीष्मप्रतिज्ञा समजली तेव्हा पांडवांना वाचवण्यासाठी त्याने एक योजना आखली. त्याच दिवशी रात्री कृष्णाने द्रौपदीला खांद्यावर घेतले आणि तिच्यासह तो भीष्माच्या गोटात येऊन दाखल झाला. त्याकाळी रात्री युद्ध बंद असे. युद्धाचे नियम ठरलेले असत. कृष्ण भीष्माच्या गोटात जाईपर्यंत कोणी जर हटकले तर कृष्ण म्हणे, ही युधिष्ठिराची पत्नी द्रौपदी आहे आणि मी तिचा शारंगपाणी नावाचा कारकून आहे.

श्रीकृष्णाने द्रौपदीला पढवून ठेवले होते. भीष्म अर्धवट समाधी अवस्थेमध्ये बसलेले होते. द्रौपदी भीष्मासमोर गेली. तिने हातातल्या

काकणांचा आवाज केला आणि म्हणाली ‘ नमस्कार करते’. भीष्मांचे डोळे बंद होते. त्यानी काकणांचा आवाज तेवढा ऐकला आणि आशीर्वाद दिला ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ’.

द्रौपदीने पुन्हा एकदा नमस्कार केला आणि मृदु आवाजात तिने विचारले, ‘ मी द्रौपदी. आपल्याला विचारते की, आपला हा आशीर्वाद या जन्मी खरा होईल की पुढल्या जन्मी ? ’

भीष्म म्हणाले, ‘ कोण द्रौपदी ? तू ? या वेळी इथे ? अग तू इथे कशी येऊ शकलीस ? तुझ्याबरोबर कोण आले आहे ?’

द्रौपदी म्हणाली, ‘ माझ्याबरोबर आले आहेत ते पलीकडे झाडाखाली बसले आहेत. ’

भीष्म म्हणाला, ‘ अग द्रौपदी, तो कृष्णच असला पाहिजे. त्याच्याशिवाय इथे यावेळी येण्याचे धाडस कोण करणार ? ’

द्रौपदी हो म्हणाली आणि तिने पुन्हा विचारले, ‘ महाराज, आपला आशीर्वाद याच जन्मी खरा होईल ना ? ’

भीष्म म्हणाले, ‘ होय द्रौपदी, याच जन्मी खरा होईल. ’

इतके म्हणून भीष्म आपल्या निवासाच्या बाहेर आले. झाडाखाली कृष्ण होताच. भीष्म म्हणाले, ‘ भगवन, एवढे कष्ट का घेतलेत ? ’ कृष्ण म्हणाला, ‘ काय करायचे ? तुम्ही उद्या सूर्यास्ताच्या आत सर्व पांडवांचा वध करण्याची घोर प्रतिज्ञा केलीत म्हणून द्रौपदीला इथे घेऊन आपल्याच तोंडून आशीर्वाद घेणे भाग पडले. ’

भीष्म म्हणाले, ‘ मग आता मी काय करु ?’

श्रीकृष्ण म्हणाला, ‘ आता द्रौपदीच्या आशीर्वादासाठी तुम्ही उद्या मरण स्वीकारले पाहिजे. तुम्ही इच्छा मरणी आहात तेव्हा

तुमच्या मरणाचा मार्ग आता तुम्हीच सांगा.'

भीष्म म्हणाले, ' मी पूर्वजन्मी स्त्री असलेल्या क्षत्रियाबरोबर रणांगणात लढत नाही. तेव्हा नियतीच्या मनाप्रमाणेच सारे होणार आहे. पूर्वजन्मीच्या अंबेने आता शिखंडीच्या रुपाने जन्म घेतला आहे. मी शिखंडीबरोबर लढणार नाही. अर्जुनास शिखंडीच्या आडून मला बाण मारण्यास सांग. उद्या मी धारातीर्थी देह ठेवीन.'

श्रीकृष्ण द्रौपदीसह पांडवांच्या गोटात आला व घडलेले सर्व वर्तमान त्याने पांडवांना विदीत केले. सर्व पांडवांना श्रीकृष्णाच्या महान बुद्धिचातुर्याचे कौतुक व अभिमान वाटला दुसऱ्या दिवशी अर्जुनाने शिखंडीच्या आडून बाण मारून भीष्मांना विद्ध केले व शरपंजरी ठेवले.

या प्रसंगाला भारतीय युद्धात आगळे महत्त्व आहे. प्रतिज्ञे-प्रमाणे भीष्मांनी पांडवांना मारले असते पण श्रीकृष्णाने अति धोरणाने त्यांना वाचविले. या गोष्टीला भीष्मांच्या व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. भीष्म इतके सत्यवचनी आणि उदार होते की त्यांनी स्वतःच आपल्या मरणाचा मार्ग सांगितला. ते अजिंक्य होते आणि इच्छामरणी होते. त्यांना शिखंडीच्या आडून बाण मारून विद्ध करण्यात अर्जुनाचा पुरुषार्थ नाही.

युद्धात आपणच आपल्या मृत्यूचा मार्ग सांगणे यापरती दुसरी उदारता कोठे असेल काय ?

हल्लीच्या जगात आपण आपला शब्द पाळावा हे सांगावे लागते. मूल्यांना जवळ जवळ मूठमाती मिळाली आहे.

□

## जुगार

जुगार म्हणजे थोडया पैशात विनासायास किंवा अल्प प्रायासाने खूप पैसे मिळवण्याची इच्छा करणे. जवळ असलेल्या पैशात समाधान न मिळाल्यामुळे लोक जुगार खेळतात व श्रीमंत होण्याची स्वप्ने बघतात. जुगार ही माणसाच्या मनातली सहजप्रेरणा असावी कारण फार प्राचीन काळापासून जुगार खेळला जात आहे.

जुगाराला प्रतिष्ठा देऊन जास्ती जास्त लोक आकर्षित करुन घ्यायचे हे तंत्र अलिकडे लॉटरीत वापरले जाते. हजारो माणसे रुपयाचे तिकीट घेऊन लखपती होण्याचे स्वप्न पाहतात. सरकारने लॉटरीला चांगलीच प्रतिष्ठा दिल्याने अनेक लोक या धंद्यात गुंतले आहेत. पत्याच्या विविध डावातून जुगार चालतो. तसेच कोणत्याही प्रकारच्या दोन बाजू असलेल्या गोष्टीवर पैसे लावून जास्त पैसे मिळवले जातात. मोठमोठ्या शहरात हॉटेलमध्ये किंवा जुगारी अड्ड्यावर स्टॉल मशिन्स ठेवली आहेत. त्यात एकादे नाणे टाकल्यावर दहा लोकातून एकाद्याला जास्त पैसे मिळतात आकडा खेळणे हाही एक जुगाराचा जबरदस्त प्रकार आहे. रोज फुटणाऱ्या आकड्यांवर लोक वेड्यासारखे पैसे लावतात. जे लोक जुगारी अड्डे चालवितात त्यांचे ते उपजिविकेचे साधन असते. दहा लोकांतील एकाला बक्षीस लागते पण नऊ लोक तळमळत असतात.

महाभारतात दुर्योधन युधिष्ठिराला द्यूत खेळायला बोलावतो. क्षत्रियांनी एका खोट्या प्रतिष्ठेपायी द्यूताला नाही म्हणायचे नाही

अशी रुढी होती. पांडव द्यूतात हरले. धर्मराजाने द्यूताला होकार दिल्यामुळे सारे महाभारत घडले. जुगारात माणूस हरत गेला की, त्या हरल्याच्या भावनेतून जुगाराची प्रेरणा अधिक उफाळून येते. माणसाची बुद्धीच भ्रष्ट होते. धर्मराजाची बुद्धी अशीच भ्रष्ट झाली आणि एकत्र कुटुंबाचा प्रमुख म्हणून शेवटी त्याने द्रौपदी देखील पणाला लावली धर्मराज जुगारापायी राज्य गमावून बारा वर्षे वनवास आणि एक वर्षे अज्ञातवासात गेला.

जुगारात जिंकण्याची आशाच माणसाला विनाशाकडे नेते. हरणे, पुन्हा प्रयत्न, पुन्हा किंचीत यश व नंतर निश्चित अपयश या दुष्ट चक्रात माणूस का सापडतो हे मानवशास्त्रज्ञदेखील सांगू शकणार नाहीत. आकडा लावणे, पत्त्यातल्या वेगवेगळ्या डावावर पैसे लावणे हे हल्ली फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. जुगार हा सर्वनाशाचा उंबरठा आहे. कष्टाच्या पैशात, पोराबाळांच्या तोंडचे घास काढून जुगारी लोक पैसे लावतात, व निश्चित हरतात. हजारो लोक यामुळे बरबाद झाले आहेत. सरकारी कायद्याप्रमाणे जुगार हा गुन्हा आहे पण सरकारने लॉटरीला प्रतिष्ठा दिली आहे.

भल्याबुऱ्या मार्गाने जुगारी जुगारासाठी भांडवल उभे करतो. त्यामुळे या दरिद्री जुगारी माणसाची प्रतिष्ठा नष्ट होते. बिनभरवशाचा माणूस म्हणून त्याची हेटाळणी होते व एकदा का पैसा सर्व संपला की, जुगाऱ्याला समाजात स्थानच उरत नाही. म्हणून चांगली संगत धरावी व सर्वनाशाप्रत नेणाऱ्या जुगारापासून अलिप्त रहावे.

□

म. ग्रं. स. ठाणे, वाचनालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
दा. क ...... दिनांक ......
विषय ...... क. ........



आचार्य रजनीश यांनी तीन हसत राहणाऱ्या संतांची गोष्ट सांगितली आहे. तीन हसणारे संत म्हणून ते ओळखले जात. ते कोठल्या तरी अज्ञात प्रदेशातून आले होते. ते ज्या गावात जात त्या गावात हास्याचे आनंदाचे फवारे उडवीत. ते हसायचे की हसणे संसर्गजन्य व्हायचे व हळूहळू पुरा गाव हसू लागायचा. ते ज्या चौफुल्यावर उभे रहात तेथे हास्याचे धबधबे पडायचे. लोक त्यांना विचारायचे ' तुमचा कांही उपदेश नाही का ?'

ते म्हणत, ' आमचा एकच उपदेश आहे की, जीवनात हसण्याच्या वृत्तीचा स्वीकार करा. जो जीवनाचा रडत स्वीकार करील त्याचा जीवनाशी संबंधच असू शकत नाही डोळ्यांतून अश्रू गाळणारा मनुष्य देवाप्रत जाऊच शकणार नाही. हास्य हा प्रभूच्या मंदीराचा मार्ग आहे. आमचा एकच संदेश आहे की, लोक प्रफुल्लित मनाने जीवनाचा अंगिकार करण्यास शिकावेत,

ते तीन संत म्हातारे झाले तरीपण गावोगाव आपला संदेश देत फिरत राहिले. एकदा त्या तीन संतांपैकी एकजण मरण पावला. गावातले लोक म्हणाले ' आतातरी हे उरलेले दोन संत रडतील. आता तरी ते दुःखी होतील.' त्यांच्या झोपडीजवळ गावकरी जमले. त्या दोन संतांनी आपल्या तिसऱ्या सहाध्यायाला हसतच निरोप दिला. त्यानंतर दुसराही मेला तेव्हाही तिसऱ्याने त्याला हसतच

निरोप दिला. काही काळानंतर तिसराही मेला. तो हसतहसतच मेला होता. आणि मरताना तो आपल्या मित्रांना सांगून मेला की, जेव्हा तुम्ही माझ्या प्रेताला स्मशानात नेऊन जाळाल तेव्हा माझे कपडे काढू नका. मला स्नान घालू नका. आहे त्या कपड्यातच मला जाळा.

सारा गाव त्या संताचे प्रेत घेऊन स्मशानात गेला. चिता पेटवली आणि त्यावर त्या संताचे प्रेत ठेवले. चिता पेटली. लोक उदास होते. कारण हसवणारे निघून गेले होते. पण चिता पेटू लागली तसे गर्दीत हास्य फुलू लागले. हसणे वाढत चालले व ते संसर्गजन्य ठरले. असे काय झाले होते साऱ्यांना हसायला ? जसा प्रेताला अग्नी भिडला तसे लोकांना समजले की, त्या मृत संताने आपल्या कपड्यात फटाके, शोभेची दारू, फुलबाज्या ठेवल्या होत्या. प्रेताला अग्नी भिडताच फटाक्याचे आवाज सुरू झाले. चितेतून भुईनळे उडू लागले. ते पाहून लोक हसू लागले. म्हणू लागले, ' खरोखर अजब साधू हा ! हसत जगला, हसतच मेला आणि मेल्यानंतरही लोकांना हसवले ? त्या गावातल्या लोकांना कळले की हसत जगता येते व हसत हसत मृत्यु पावता येते. मृत्यूच्या नंतरही मागे हसण्याची शक्यता निर्माण करून ठेवता येते.

हसणे व रडणे या दोन्ही क्रिया नैसर्गिक आहेत. जीवनात सुख थोडे व दुःख फार आहे हे सत्य असले, तरी हसत जगले तर जीवन आनंददायक होते. दुःखाचा स्वीकार करीत आनंदी व्हायचे ही एक फार मोठी कला आहे. निराशावादी, शून्यवादी, अस्तित्व-वादी लोक जीवन असार शून्यवत आहे असे म्हणाले तरी केवळ हास्यच जीवनात उभारी देते. म्हणून खूप खूप हसले पाहिजे.

## प्रभावी योजकता

आपल्या देशात व इतरत्रही धर्माची तत्त्वज्ञानाची व उपदेशकांची एवढी बांडगुळे निर्माण झालीत की, त्यातून भ्रांत दैववादापलिकडे काही शिकवलेच जात नाही. नशिबात ज्याप्रमाणे असेल तसेच होईल. वृथा प्रयत्नांचा उपयोग नाही. असे म्हटले जाते. प्रयत्नाप्रमाणे काही वेळा घडत नसेल व प्रयत्नांचा उपयोग नसेलही पण हे कोणी म्हणावे ? ज्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्यांनी म्हणावे. मराठी चौथी नापास झालेल्या विद्यार्थ्याला बी ए. एम्. ए. या पदव्यात काही तथ्य नाही असे म्हणण्याचा अधिकार नाही. शिक्षणाने निर्भयता, स्पष्ट वक्तेपणा व योजकता प्राप्त झाली पाहिजे. मनातल्या मनात अस्मिता बाळगून सामान्य माणसाला पुढे गेले पाहिजे. समाजात एकटा दुकटा संत महात्मा पंथनिर्माता काहीच करु शकत नाही. समाजोन्नतीसाठी सामुहिक प्रयत्न हवे.

जपानमध्ये ही योजकता फारच प्रकर्षाने आढळते. जपानी लोकांनी व सरकारने एक लोखंड सप्ताह करण्याचे ठरविले. सर्व जपानमध्ये जाहीर करण्यात आले की, या आठवड्यात प्रत्येक व्यक्तीने अडगळीतले लोखंड, पोलाद व तत्सम धातूचे निरूपयोगी तुकडे गावातील एका प्रमुख चौकात आणून टाकावेत. अशा लोखंडाचे जपानी लोकांनी ढीगच्या ढीग शहरातील चौकात आणून टाकले. आठव्या दिवशी ते लोखंड रेल्वेच्या कारखान्यात नेण्यात आले. नंतर लौकरच सरकारने जाहीर केले की, लोखंड सप्ताहातून जे

लोखंड जमा झाले त्यापासून रेल्वेची सात इंजिने तयार झाली. हा सामुदायिक प्रयत्न स्फूर्तिदायक दैवत आहे. आळस जरा म्हणून उपयोगी पडत नाही. आपल्याकडे कोणत्याही खेड्यात जा, वेशी-जवळच्या पारावर कट्ट्याशी पाच पंचवीस माणसे बसलेली, पेंगत असलेली वा झोपलेली दिसतील. किती मानवी तास वाया जात असतात. तोंडाने भ्रांत दैववाद बोलत असतात.

सतत उद्योग, प्रयत्न, आळसाचा त्याग करुन कार्यरत राहिले पाहिजे. अन्यथा, दोन वेळा पोटाला अन्नही मिळणार नाही. तसेच होत आहे. ते अटळ आहे. ज्या राष्ट्रात धर्मातून नुसते शद्ब उपजतात तेथे आळसाचा त्याग होणार नाही. उलट, आळसाच्या समर्थनासाठी धर्म किंवा तत्त्वज्ञानाचा वापर होईल. अविरत श्रम म्हणजेच खरे जीवन !

□

९५६३ ३१/१/६८

## आसक्तीचा नाश

दोन बौद्ध भिक्षू आश्रमाकडे निघाले होते. दिवस पावसाळ्याचे होते. वाटेत नदी होती. जातांना गुडघाभर पाणी असलेल्या नदीत आता छातीइतके पाणी आले होते. भिक्षूंना इतक्याही पाण्यातून नदी पार करण्याची सवय होती. ते दोघे पाण्यात पाय टाकणार एवढ्यात आवाज आला, ' अहो, मला जरा पलिकडे पोहचवता का ?' दोघांनी मागे वळून पाहिले. एक सुंदर तरूणी त्या दोघांची याचना करीत होती. ती पुन्हा म्हणाली, ' माझे बाळ भुकेने कासावीस झाले असेल. दया करा. मला खांद्यावर घ्या आणि लवकर पलिकडे पोचवा. मला पाण्याची भीती वाटते.'

पहिला भिक्षू म्हणाला, ' बाई, आम्ही बुद्ध भिक्षु ! संन्यासी. स्त्रीचा स्पर्श आम्हाला चालत नाही. आम्ही काही तुला नेऊ शकणार नाही. पाणी उतरल्यावर या मागावून.'

एवढ्यात दुसरा भिक्षू म्हणाला, ' बाई थांबा, बसा माझ्या खांद्यावर. मी नेतो तुम्हाला पलिकडे.' आणि खरेच त्या दुसऱ्या भिक्षूने तिला खांद्यावर बसवून पलिकडच्या तीरावर नेऊन सोडले.

पहिला भिक्षू या गोष्टीचा विचार पंधरा दिवस मनात घोळवीत राहिला. शेवटी त्याला राहवेना, तेव्हा तो दुसऱ्या भिक्षूला म्हणाला, ' गेले पंधरा दिवस मी विचार करतोय. एका सुंदर स्त्रीला तू खांद्यावर बसवून नदीपार केलेस. तुझे ब्रह्मचर्य पक्के नाही.'

दुसरा भिक्षू म्हणाला, ' अरे पंधरा दिवस विचार करण्याइतका

का हा विषय मोठा आहे ? गेल्या पंधरा दिवसात एकदाही मला त्या प्रसंगाची आठवण झाली नाही. माझ्या मनात आसक्ती असती तर मी तो प्रसंग विसरलो नसतो. तू मात्र त्या प्रसंगाची देखील आसक्ती ठेवलीस. अजून तुला त्याने पछाडले आहे. ही मानसिक अवस्था फार घातक आहे. आसक्ती तुझ्या मनात घर करून राहिली आहे. माझ्या मनात मात्र आसक्ती नव्हती मी निर्लेप मनाने तिला खांद्यावरून पोचवले. तिला गरज होती ती विनवीत होती म्हणून मी तिच्या उपयोगी पडलो इतकेच. तिच्याविषयी माझ्या मनात पुन्हा विचार आला नाही.'

आसक्तीशी झगडून आसक्ती नाहिशी होत नाही. वागण्यात साधेपणा, सहजपणा आला म्हणजे आसक्ती आपोआप दूर पळते. म. गांधींनी आसक्ती दूर करण्यासाठी सत्याचे व ब्रह्मचर्याचे खूप प्रयोग केले. सत्याचे प्रयोग म्हणतात त्यांना ! आपण मनातून किती आसक्त असतो हे बाहेरच्या माणसाला कळणार नाही. मनातली आसक्ती लपविण्यासाठी माणूस दांभिक बनतो. अभावात ब्रह्मचर्य नव्हेच ! केलेल्या दानाबद्दल देखील मनात आसक्ती येता कामा नये. सरोवरातील कमलपत्राप्रमाणे निर्लेप वृत्ती म्हणजे आसक्तीचा पूर्ण अभाव होय.

□

## पराकोटीची चिकाटी

आपल्यापैकी बहुतेक सारे चिकाटी दाखवू शकत नाहीत. जोपर्यंत प्रयत्नातून सुख, आनंद व समाधान मिळत असेल तोवरच आपण कोठलीही गोष्ट करतो. पण आपण आरंभलेल्या चांगल्या कामात जर वारंवार अपयश येऊ लागले, तर मात्र आपण त्या कार्याच्या प्रयत्नातून पळ काढतो.

फार वर्षांपूर्वी पुण्यास लकडी पुलाजवळ फूटपाथच्या कोपऱ्यावर रोज सायंकाळी ठीक सहा वाजता एक ख्रिश्चन मिशनरी यायचा. तिथं उभा राहून तो ख्रिस्ती धर्माचा प्रचार करण्यासाठी प्रवचन देत असे. तो ठराविक वेळ प्रवचन करायचा आणि निघून जायचा. कित्येक महिने त्याचा हा कार्यक्रम चालू होता. त्याच्याकडे कोणी लक्षच द्यायचे नाही. धर्माधर्मामध्ये कितीही मतभेद असले तरी आपल्या धर्माचा नम्रपणे प्रचार करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. रस्त्यावरून येणारे जाणारे त्या ख्रिस्ती मिशनऱ्याला ' वेडा पाद्री ' म्हणत. त्याच्याकडे लक्षही देत नसत. एके दिवशी काही टवाळखोर मुलांनी त्या पाद्र्याला दगड मारला. तो वर्मी लागून त्याच्या डोक्यातून रक्त वाहू लागले. पाद्री हसू लागला व म्हणाला, 'वर्षभर माझी कोणी दखलही घेतली नाही. आज माझी प्रार्थना सफल झाली. कशी का होईना माझी दखल घेतली गेली. हे प्रभो, मी तुझा ऋणी आहे. माझ्या कामात मी पुढे यशस्वी होईन हा विश्वास तू मला दिला आहेस.'

पूर्वी रेल्वे मार्गात बोगदे नव्हते.बोगदे काढून त्यातून आगगाडी न्यावी असे एका इंजिनिअरने सुचविले. त्याला वेड्यात काढण्यात आले, पण त्यानेच काही वर्षात पुणे-मुंबई मार्गावर बोगदे काढले व साऱ्यांना चकित केले.

प्रयोगशाळेत रात्रं-दिवस बसून तहानभुकेची पर्वा न करता शास्त्रज्ञ नवीन नवीन शोध लावतो. वर्षानुवर्षे त्यात त्याला अपयश येते. पण कधीतरी यशाचा एक दिवस उजाडतो. चिकाटीचे फळ त्याला मिळते. शास्त्रज्ञांच्या चरित्रावरून ही गोष्ट स्पष्ट होते.

चिकाटी हा फार थोड्या लोकांमधील गुण आहे. कोणत्याही कार्यात पराकोटीची चिकाटी धरल्यास हमखास यश येते, आणि समजा यश न आले तरी भरपूर प्रयत्न केल्याचा आनंद तरी कोणी हिरावून घेऊ शकत नाही. तत्त्वज्ञान शिकविते, स्थिरबुद्धीचे कर्मयोगी विचार. जेथे चिकाटी नाही तेथे कधीही ऊर्जितावस्था येणार नाही. दोषांचे निर्मूलन आणि गुणांची जोपासना फक्त चिकाटीतूनच साध्य होईल.

□

दा. क्र. ९५८३ ३१/७/६८
विषय

## सामान्य जनाबद्दल अपार करूणा

कोणत्याही समाजधुरीणाचे मोल तो वैयक्तिक दृष्टीने किती ऊंच आहे यापेक्षा त्याला सामान्य जनाबद्दल किती कळवळा, करूणा व प्रेम आहे यावर उरत असते.

बौद्ध धर्मात मानव निर्वाण मिळवू शकतो. त्याला पुन्हा जन्म-मृत्यूच्या चक्रात यावे लागत नाही. बौद्ध धर्म पुनर्जन्म मानतो पण निर्वाणप्राप्तीनंतर पुन्हा जन्म नाही. बोधिसत्त्वाला मुक्तिपेक्षाही सामान्य जनाबद्दल जास्त वाटते. बोधिसत्त्वाचा विशेष म्हणजे जोपर्यंत शेवटचा सामान्य माणूस बंधनात आहे तोपर्यंत बोधिसत्त्व स्वतःसाठी मुक्ति स्वीकारीत नाहीं, पुन्हा जन्माला येऊन सामान्य जनांना बंधनातून सोडविण्यास तो मदत करतो. गौतमबुद्ध बोधिसत्त्व होता.

तुकाराम महाराजाना सामान्य जन बुडत आहेत हे पाहून त्यांच्याबद्दल कणव येते. त्यांना सामान्य जनांचा उद्धार करावयाचा होता म्हणून ते पांडुरंगाला म्हणतात - मला मुक्ती नको. लोकांच्या उद्धारासाठी ‘ सुखे घालावे गर्भवासी. ’ सामान्य माणसांचा उद्धार झाल्याशिवाय वैयक्तिक मुक्तिची ते अपेक्षा करीत नाहीत. नव्हे, ती ते लाथाडतात.

आपल्या जीवनात आपण आपल्यापेक्षा सत्ता, संपत्ती, विद्वता, यौवन ज्यांच्याजवळ कमी आहे त्यांचा न कळत तिरस्कार करतो आम्ही काय झोपडपट्टीकाले आहोत काय ? असे म्हणून झोपड-

पट्टीत राहणाऱ्या लोकांना हीन लेखतो. सामान्य ते सामान्यच म्हणून त्यांची उपेक्षा करतो. माणूस अपंग असला, रोगी असला तरीअपंगुत्व किंवा रोग त्याने स्वतः निर्माण केलेले नाहीत हे जाणले तर त्यांच्याबद्दल आपल्याला अपार कणव वाटली पाहिजे. एका उन्नत मनुष्याने एका सामान्य जनाचा अश्रु पुसला, त्याला सहानुभूती दाखविली तर हे जग नंदनवन होईल. आपल्याला या समाजात जगावयाचे आहे. आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय, दुर्बलांची असहाय्य स्थिति फार काळ टिकू शकत नाही. ही कीड वाढली की, क्रांतीची बीजे पसरतात. त्याला थोपविण्याचे कार्य कोणीच करणार नाही. सभोवताली पन्नास अर्धपोटी किंवा उपाशी माणसे ठेवून आपण भरल्या पोटी राहू शकणार नाही. म्हणून, सामान्य जनाबद्दल कळवळा निर्माण झाला पाहिजे, अंतर्मुख होताच तो कळवळा, करुणा, प्रेम क्षणार्धात अवतरेल.

□

## निरिच्छपणा

आपण मानव म्हणून जन्माला आलो, बरोबर हजारो इच्छांचे मोहोळ उठवीत ! इच्छांचा नाश झाला की, मुक्ति तत्क्षणी मिळते असे म्हणतात. सामान्य माणसाला जास्तीतजास्त निरिच्छपणा कसा मिळविता येईल हा प्रश्न आहे. कोणत्याही इच्छेने, वासनेने आपल्यावर अधिकार गाजवता कामा नये.

एका साधूच्या मोठेपणाची कीर्ती ऐकून सिकंदर बादशहा एकदा त्याला भेटायला गेला. सकाळची वेळ होती. कोवळी उन्हं अंगावर घेत तो साधू चिंतनात मग्न झाला होता त्याच्याजवळ येऊन सिकंदराने विचारले, ' महाराज मी आपली काय सेवा करु ? आपण मागाल ते मी देईन.' साधूने सिकंदराकडे पाहिले आणि एवढेच म्हणाला, ' मी सूर्याची कोवळी किरणे अंगावर घेत आहे मध्येच उभा राहून आपण ती अडविली आहेत. कृपा करुन बाजूला व्हा, आणि कोवळी उन्हं अंगावर घेऊ देत. मला दुसरे काही नको.'

सिकंदर विस्मित झाला. त्याने त्या साधुपुढे लोटांगण घातले. इतका निरिच्छपणा साधुसंत दाखवतात. त्यांचे साध्य भौतिक नसतेच. छत्रपति शिवाजी महाराजांनी तुकाराम महाराजांना द्रव्य-वस्त्रांचा नजराणा पाठविला. तुकारामांनी तो परत केला. शिवाजी महाराजांनी त्यांना भेटीला बोलावले तर ' तुम्हापाशी आम्ही येऊनिया काय, वृथा आहे शीण चालण्याचा ' असे त्यांना सुनावले. द्रव्यवस्त्र मृतिकेसमान मानणाऱ्या साधूंचा इतका निरिच्छपणा सामान्य

माणसाला शक्य आहे काय ? नसेलही कदाचित. पण एक गोष्ट निश्चित की, जेव्हा आपण आपल्या इच्छा, वासना अमर्यादपणे वाढवितो त्यावेळी आपणच आपले दुःख वाढवून घेतो, इच्छा अनावर झाल्या म्हणजे त्यांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न आला. प्रयत्नात यश व अपयश ओघातच आले. यशानंतर किंवा अपयशानंतर पुन्हा इच्छा पुन्हा प्रयत्न अशी ही दुष्ट साखळी वर्धमान होते आणि आपले दुःख कायमच राहते. इच्छांचा पसारा कमी करणे मात्र आपल्या हातात आहे. नैसर्गिकपणे हजारो इच्छा निर्माण होवोत, त्यांनी आपण वहावत जात नाही ना ? एवढी इच्छांची ओळख करून घेतल्यास जीवन शांतिमय व पवित्र बनेल. थोडेसे अंतर्मुख झाले की, इच्छांचा फास ढिला होतोच होतो.

□

## जीवन ही यात्रा आहे !

एका राजवाड्यात एक संन्यासी आला. जवळची चटई टाकून तो तेथं झोपला. पहारेकरी आला, म्हणाला, ' ऊठा. येथून हा राजावडा आहे येथे झोपायचे नाही, ' संन्याशी म्हणाला, ' ही धर्मशाळा आहे. मी येथेच झोपणार.' पहारेकऱ्याने ही गोष्ट सेनापती व मुख्य प्रधानाच्या कानावर घातली. ते दोघेही तेथे आले. हात जोडून म्हणाले, ' हा राजवाडा आहे. आपली सोय बाहेरच्या अतिथीगृहात उत्तम तऱ्हेने करतो तेथे चलावे.' संन्याशी पुन्हा तेच म्हणाला,' ही धर्मशाळा आहे. मी येथेच झोपणार.' व तो तेथेच झोपून राहिला.सेनापती व प्रधानाला पेच पडला. त्यांनी संन्याशाची अरेरावी राजाला जाऊन सांगितली तेव्हा राजा स्वतः तेथे आला आणि हात जोडून म्हणाला,' महाराज उठावे. हा राजवाडा आहे.' संन्यासी चटईवर उठून बसला व राजाला म्हणाला. ' राजा, या वाड्यात आजवर कोणकोण राहिले ?'

राजा म्हणाला, ' माझे पणजोबा, आजोबा, वडील आणि मीही येथेच रहात आहे.'

संन्याशाने विचारले, ' पणजोबा कोठे आहेत ?'

राजा म्हणाला, ' ते स्वर्गवासी झाले.'

' आजोबा कोठे आहेत ?'

' ते पण स्वर्गवासी झाले. '

‘ वडिल कोठे आहेत ?’

‘ तेही स्वर्गवासी झालेत.’

‘ आणि तुझे काय होणार ?’

‘ वेळ आली म्हणजे मलाही जावे लागणार.’

संन्याशी म्हणाला ‘ अरे मग राजा, या राजवाड्यात आलेले सारेच गेले आहेत मग ही धर्मशाळाच नव्हे काय ?’

संन्याशाचा मतितार्थ राजा उमगला. त्याने संन्याशाचे पाय धरले. संन्याशी चटकन निघून गेला.

आपली जीवनयात्रा सुरू झाल्यापासून संपेपर्यंत आपण कोठे ना कोठे मुक्काम करतो. उगाच आपण माझे घर, माझा बंगला, माझा राजवाडा असे म्हणून गर्व वाहतो. यात्रा संपत असते. मुक्काम हलतो. एक येतो, दुसरा जातो. जीवनयात्रेत प्रति नवीन क्षणी आपल्या मुक्कामाची जाणीव पाहिजे म्हणजे नसता लोभ व गर्व निर्माण होणार नाही. मग जमिनीवर झोपून आकाश हे पांघरुणदेखील दुःखमय वाटणार नाही. घरच्याप्रमाणे यात्रेत सुविधा मिळत नाहीत तसे जीवनयात्रेत अनेकदा सुख दुःखाचे अनुभव येणारच ! तत्त्वज्ञान जीवन ही एक यात्रा आहे हेच शिकविते.

□

## टांगेवाला भांडवलदार कसा ?

आमच्या गावापासून रेल्वेचे स्टेशन सुमारे दोन मैल आहे. स्टेशनवर जायला गावात सुमारे चाळीस टांगे आहेत. त्यातले फक्त दहा-बारा टांग्यांचे घोडे चांगले होते. बाकीच्या टांग्यांना मरतुकडी घोडी होती. पण प्रत्येक टांगेवाला येतील तितके उतारू बसवून घ्यायचा ! गांव आडवळणी असल्याने बसची सोय नव्हती स्टेशनवर जायला ! टांग्याशिवाय दुसरे वाहन नव्हते स्टेशनवर यायला.

एकदा मला मुंबईला जाणारी एक्स्प्रेस पकडायची होती. बरोबर सव्वा नऊ वाजता एक्स्प्रेस होती. त्यादिवशी आमचा नेहमीचा टांगेवाला आजारी असल्याने मला दुसऱ्या टांग्याने स्टेशनवर येणे भाग होते. गावातून निघायलाच नऊ वाजले होते. माझ्या वाट्याला एक मरतुकड्या घोड्याचा टांगा आला होता. तो अशा काही गजगतीने चालला होता की,आम्ही साडेनऊच्या आत स्टेशनवर पोहोचणे शक्यच नव्हते. मला फार महत्त्वाचे काम असल्याने एक्स्प्रेसने मुंबईला जायलाच पाहिजे होते मी टांगेवाल्याला म्हणले, ‘ अरे बाबा माझी गाडी चुकेल. टांगा जरा जोरात पळव ना !’ टांगेवाला म्हणाला ‘ साहेब, मुकं जनावर ते त्याच्या अंगात बळच राहिले नाही पण काही काळजी करू नका. आपण वेळेवर जाऊ. मी म्हटले ‘ अरे बाबा अशा चालीने आपण साडेनऊपर्यंत जाणे शक्यच नाही.’ मग मी टांगेवाल्याला सांगितले की,बाबा मी तुला दोन रुपये जास्त देतो पण टांगा जरा पळव. दोन रुपये मिळणार म्हणताच टांगेवाल्याने

तीन चार चाबूक मारले आणि टांगा अगदी जोरात पळू लागला. मी वेळेवर आलो होतो. गाडी स्टेशनवर आली होती. सुटणार होती लगेच. माझ्या दोन रुपयाचा परिणाम म्हणजे मला गाडी मिळाली होती.

मनांत विचार आला की, या टांगेवाल्याला गरीब म्हणायचे का भांडवलदार म्हणायचे ?

भांडवलदार म्हणजे तरी काय ? दुसऱ्याच्या अडचणींचा फायदा घ्यायचा. मग टांगेवाला माझ्या अडचणींचा फायदा घेऊन दोन रुपये जादा मिळवून भांडवलदारच झाला होता. साखर सम्राट तरी काय करतात ? दिवाळी तोंडावर आली की, बाजारातली बहुतेक साखरेचा विकत घेऊन साठा करायचा व दिवाळीत भाव वाढवून ती विकायची ! हा मोठा भांडवलदार झाला. टांगेवाला हा छोटा भांडवलदार होतो. आपण भांडवलदारावर राग राग करतो पण आपल्यापैकी बहुतेक सर्वजण असेच करतो की, दुसऱ्याच्या अडचणींचा फायदा घेऊन आपले उखळ पांढरे करायचे. भांडवलशाही लोकशाहीपेक्षा अधिक फायदे मिळवते. कम्युनिष्ट कायलोकशाही काय आणि भांडवलदार काय एकाच माळेचे मणी. दुसऱ्यांची अडचण तोच आपला फायदा हे वर्तन प्रत्येक प्राणीमात्राचे असते, कारण भांडवलशाही ही एक मनाची विकृत वृत्ती आहे.

□

## कर्मवीर भाऊराव पाटील

शिक्षण क्षेत्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नांव सुवर्णाक्षरानी लिहिले पाहिजे. नुकतीच कर्मवीरानी स्थापन केलेल्या 'रयत शिक्षण संस्थे'ची हिरक जयंती मोठ्या प्रेमाने साजरी करण्यात आली. सन १९१९ मध्ये कराड तालुक्यातील काले येथे भाऊरावांनी ' रयत शिक्षण संस्था ' स्थापन केली. या संस्थेचा आता खरोखरच वटवृक्ष झाला आहे. भारतातली ही संस्था सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. सध्या संस्थेची २० महाविद्यालये, ३१३ माध्यमिक शाळा, ९२ कनिष्ठ महाविद्यालये, ७ प्राथमिक शिक्षक प्रशिक्षक संस्था, ५ प्राथमिक शाळा, ३ संस्कार केंद्रे, ५ तंत्रशाळा आणि ७५ वसतिगृहे आहेत. हे कार्य फारच प्रचंड आहे.

कर्मवीर भाऊरावांचा जन्म १८८७ साली ' कुभोज ' या गावी झाला. पुढे शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आले व जैन बोर्डिंगात राहिले. वसतीगृहाचे चालक व भाऊराव यांची खडाजंगी होऊन त्यानी इंग्रजी सहाव्या इयत्तेतच बोर्डिंग सोडले व पुढे कधी त्यानी शिक्षण घेतले नाही. नंतर ते राजर्षि शाहू महाराजांच्या राजवाड्यात मुलाना सोबती म्हणून राहिले. या काळात त्यानी व्यायाम करून बलदंड शारीरिक शक्ति कमावली, लोकमान्य टिळकांनी देखील एक वर्षपर्यंत अभ्यास परीक्षा सोडून शारीरिक संपत्ती मिळवली. श्री राजर्षि शाहू महाराजांनी लिंगायत, जैन, मुस्लिम, प्रभु, महार, शिंपी इत्यादी प्रत्येक प्रमुख जाती धर्माची वसतीगृहे स्थापन

केली. ते सर्व जातीच्या लोकांना समानतेने वागवीत व मदत करीत. भाऊरावांनी हे सूक्ष्मपणे पाहिले. १९२४ मध्ये काल्याहून संस्थेने सातारा येथे स्थलांतर केले. बहुजन समाज अशिक्षित होता व शिक्षणाशिवाय परिवर्तन अशक्य म्हणून त्यानी आजन्म शिक्षण प्रसाराला वाहून घेतले. जीवन घडविणारा व त्यात आनंद निर्माण करणारा जगात एकटाच मार्ग आक्रमित असतो व त्याची त्याला खंतही नसते. शाहू महाराज तसेच म. फुले व म. गांधीजी या त्रयींच्या अमाप प्रेमाचे भाऊरावांच्यावर संस्कार झाले होते. १९३७ साली विद्यार्थ्यांची प्रथम तुकडी संस्थेतून शिकून बाहेर पडली त्यावेळी या विद्यार्थ्यांनी रयत शिक्षण संस्थेत राहून समाजसेवा करावी अशी प्रतिज्ञा घेतली. भाऊसाहेबांच्या जीवन तत्वज्ञानाची पुढील तीन सूत्रे होती. १) सर्व धर्म, जाती, पंथाच्या मुलांना मोफत शिक्षण २) बहुजन समाजात शिक्षण प्रसार ३) स्वावलंबनाने शिक्षण.

कर्मवीर भाऊरावांनी श्री शाहू महाराजांच्या एक पाऊल पुढे टाकून वसतीगृह सर्व विद्यार्थ्यांसाठी, मग त्यात कोणत्याही जातीचे विद्यार्थी असोत, सर्व धमे समान मानले. त्यांना शिक्षण मोफत करायचे होते, पण एवढा मोठा प्रपंच वाढल्यावर ते अशक्यच झाले. ज्या ज्या वेळी संस्थेतील मुलांची आबाळ होते आहे असे दिसताच कर्मवीरांनी आपल्या बायकोचे सुमारे शंभर तोळे मोडून मुलांना जेऊ घातले. या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नीचे फार सहाय्य झाले. एकदा तर सौ. लक्ष्मीबाईनी आपले मंगळसूत्रही मोडले व उपाशी मुलाना जेऊखाऊ घातले. भाऊरावाना हे समजताच सौ. लक्ष्मीबाई म्हणाल्या ‘ तुम्ही असल्यावर मंगळसूत्र काय करायचे ?’

भाऊरावांनी उपेक्षित भागात शिक्षणप्रसार केला व तो आचरणात ही आणला. जो बहुजनसमाज दारिद्र्य व अंधश्रद्धेने बांधला गेला

आहे व परिणामी हलाखीचे जीवन जगतो, त्यांच्यासाठी शिक्षणप्रसार हे एकच रामबाण औषध कर्मवीरांनी खेड्यातल्या बहुजन लोकांना दिले. भाऊरावांचे कार्य लोकांचे व्यक्तिमत्त्व घडवायचे हे होते. ते त्यानीच अगदी यशस्वीपणे केले. भाऊरावांच्या सर्व कार्यातील पावित्र्याबद्दल व शुचितेबद्दल शंका नसण्याचे कारण म्हणजे ते अंधश्रद्धाळू नव्हते. जीवनातला प्रत्येक क्षण त्यांना पवित्र वाटे. शकून, मुहूर्त, शुभाशुभ, भुते-खेते इत्यादि कशावरही त्यांचा विश्वास नव्हता करारी बुद्धिवादाचा त्यानी आपल्या शिक्षण प्रसारात उपयोग केला हे विशेष आहे.

कर्मवीरांनी पैशासाठी कोणापुढे हात पसरला नाही. पैसा भाऊरावांच्या कार्यामागे धावत असे. एकदा एका श्रीमंत व्यापाऱ्याने विचारले की, छ. शिवाजी कॉलेज या संस्थेचे नाव बदलून जर माझे नाव द्याल तर मी दोन लाख रुपये देईन. भाऊरावांनी तातडीने त्यांना कळविले की, तुमचे पैसे नकोत, कारण शिवाजी कॉलेजचे नाव कदापी बदलले जाणार नाही.

स्वावलंबनाला भाऊरावांनी प्रथमपासून महत्त्व दिले होते. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. श्रमातून शिक्षण आणि शिक्षणातून स्वावलंबन या सूत्रानुसार त्यांचे प्रयत्न सदोदित असत. भाऊरावांनी आपल्या संस्थेंतून त्यागी, समाजसेवकांची, शिक्षकांची एक मोठी पिढी घडवून आणली. समाजऋण व देशऋण त्यानी शिक्षण प्रसाराद्वारे फेडले. तसेच पारतंत्र्यात असताना संस्थेच्या हिताच्या दृष्टीने प्रत्यक्ष चळवळीत जरी ते उतरले नाहीत तरी स्वातंत्र्याच्या लढ्याची कर्मवीर ही एक प्रेरक शक्ती होती. अज्ञानाचा अंध:कार दूर करण्याबरोबरच अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा व दुष्ट रुढी, परंपरा या विरुद्धही भाऊरावांनी आयुष्य वेचले. महाराष्ट्रात त्यांनी

' श्रम करा व फुकट शिक्षण घ्या ' हा मंत्र जपला. तेव्हा कोणत्याही जातीतला विद्यार्थी मला शिक्षणाला पैसा नाही या सबबीवर घरी बसता कामा नये. सामाजिक समतेसाठी शिक्षण क्षेत्रात कार्य करून ते लोकांच्या आदराने कर्मवीर झाले. त्यांचा व श्री गाडगे महाराजांचा, शाहू महाराजांचा, कर्मवीर वि. रा. शिंदे यांचेशी दाट परिचय होता कारण हे सारेजन समाजातल्या डोळस क्रांतीसाठी झगडत होते. आपापल्या परीने ! म. गांधींनी सुद्धा भाऊरावांच्या कार्याचा गौरव केला. पुणे विद्यापीठाने कर्मवीरांना ' डी. लिट ' ही पदवी दिली वास्तविक ते ससूनमध्ये आजारी होते तरी कुलगुरुनी तेथे जाऊन त्यांना ती पदवी दिली, भारतसरकारने त्यांच्या कार्याचे मूल्यमापन योग्य तऱ्हेने केले व त्यांना पद्मभूषण हा किताब दिला. विद्यार्थ्यांनी भाऊरावांना एक मोटार घेऊन दिली, कारण सतत प्रवास व वाहन नसल्याने वेळ फुकट जाणे हे वाचवायचे होते.

अशा तऱ्हेने जनता, विद्यापीठ व सरकार या तिघांकडूनही सन्मान मिळविणारे कर्मवीर अजोड होते. ते कमालीचे अपरिग्रही होते. जन्मभर अनवाणी चालले. मोठ्या लोकांचे जीवन फार मोजक्या शब्दात असते ' बहुजनांसाठी स्वावलंबनाने शिक्षणप्रचार ' या तीन शब्दात कर्मवीरांचे उदात्त दर्शन घडते.

□

म्हटलेले त्याला खपले नाही. बादशहाचा चेहरा रागाने लालबुंद झाला. बिरबलाच्या हे लक्षात आले. समयसूचकता दाखवून हात जोडीत तो बादशहाला म्हणाला, ' महाराज, आपण रागावता कशाला ? मी म्हटले की, आपके पावसे यह पांव अच्छे है । याचा अर्थ असा की, आपले पाय आहेत म्हणूनच बेगमसाहेबांच्या पायांना शोभा आहे.'

' आपके पावसे यह पाव अच्छे है ' या वाक्याचा दुसारा अर्थ बिरबलाने स्पष्ट केल्यावर बादशहा खूष झाला. बेगमसाहेबाही खूष झाली होतीच.

सर्वसामान्यपणे राजाच्या पदरी पूर्वी खूप खुषमस्करे असायचे. राजाचा क्रोध कोणी ओढवून घ्यायचा या भीतीने राजाचे वैगुण्य कोणी दाखवीत नसत. बिरबलाने प्रसंगावधान राखून दोघांनाही खूष केले. कोणाची स्तुती कोणापुढे करावी असा प्रश्न आपल्याला पुष्कळदा पडतो. दोघांमध्ये कोणीही एकाला दुसऱ्याच्या देखत चांगला किंवा वाईट म्हणू नये. दोघांनाही चांगले म्हणावे. तुलना करतांना दोघांचेही गुण वर्णावित. हा व्यवहार आहे. कदाचित दोघां-पैकी कोण चांगला कोण वाईट हे आपल्याला मनोमनी माहीतही असेल पण त्याचा उच्चार त्या दोघांपुढे कधीही करू नये.

संस्कृत भाषेत एका श्लोकात म्हटले आहे की, दुसऱ्यांचे नेहमी गुणच वर्णन करावेत. म्हणजे ज्या माणसाजवळ गुण नाहीत तो देखील गुणी होतो. कोणाचेही मर्मवाक्य बोलू नये. कशाला कोणाची निंदा करा ? शद्ब फार जालीम व विषारी बनू शकतात त्यांच्यामुळे हत्यारापेक्षाही मोठी जखम होऊ शकते. म्हणून दोघात त्यांच्यापुढेच एकादा निर्णय द्यायचा असेल तर तो कोणत्याही

एका बाजूने घेऊ नये. याला अपवाद जरूर आहेत. स्पष्टवक्तेपणा चांगला पण त्याने जर कोणाला राग येण्याचा प्रसंग येतो असे वाटले तर खुशाल गोड शब्दांनी दोघांचीही स्तुती करावी.

महाभारतात सांगितले आहे -


‘ सत्यस्य वचनं श्रेयः, सत्यादपि हितं वदेत ’

याचा अर्थ असा की, सत्य बोलणे केव्हाही चांगले पण सत्यापेक्षा हितकारक बोलावे म्हणजे व्यवहारात त्याचा उपयोग होतो. देव देखील स्तुतीप्रिय आहेत असे म्हणतात. मग माणसे स्तुतीने भाळतील यात नवल ते काय ?

□

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. 9563 दिनांक 31/1/84
विषय ........ क्र. ..........

# मनोरंजनातून संस्कार



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. १५६३

BVBK-0401563
BVBK-0401563

डॉ. म. गो. देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. १५६३ दिनांक ३१।१।८४
विषय ........ क्र. ........

वाचनालय
बा.वा.
१५६३
३/११८४

# मनोरंजनातून संस्कार

## भाग १

डॉ. म. गो. देशपांडे

BVBK-0401563
BVBK-0401563

सन्मित्र
सन्मित्र प्रकाशन

१७९, फुलेवाडी, कोल्हापूर.

सर्वहक्क
कु. देविका म. देशपांडे

प्रथमावृत्ती– सप्टेंबर १९८२

प्रकाशक
मंगेश म. वेदांते
सन्मित्र प्रकाशन
१७९, फुलेवाडी, कोल्हापूर.

मुद्रक
मेघनाथ भगत
ललित प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

मुखपृष्ठ–
श्रीकांत हर्डीकर

मूल्य रुपये सात

□ महाराष्ट्रातील संस्कारक्षम बालगोपालांना